शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक जुलै २०२१
अंक क्र. ४७
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 49 अंक : 78 कोल्हापूर सोमवार ता. 26 जुलै 2021 किंमत 2 रुपये ❋ पाने 4+12 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## राष्ट्रध्वजाचा इतिहास

ध्वजाचे महत्त्व पुराणकालीन आहे. आपल्या देशाचा जो राष्ट्रध्वज आपण पाहतो त्यामागे मोठा इतिहास आहे. मार्गारेट एलिझाबेथ नोबल नावाची महिला आयर्लंड सोडून भारतात आली. येथे आल्यावर तिने सिस्टर निवेदिता हे नाव धारण केले. पहिला राष्ट्रध्वज सादर करण्याचा मान तिच्याकडे जातो. भारतासारख्या शक्तीशाली दशाचा ध्वज 'वज्रांकित' का नसावा असा प्रश्न तिला पडला. तिने ध्वज बनविण्याचे काम सुरू केले. तिने तयार केलेला ध्वज समचौरस व रक्तवर्णीय असून त्यावर वज्राचे चित्र होतं आणि बंगाली लिपीत 'वंदे मातरम्' ही अक्षरे अंकित केली आणि ध्वजाच्या चारही किनाऱ्यावर १०८ पणत्या दाखविल्या. १९०६ साली काँग्रेसच्या अधिवेशनात ठेवण्यात आला.

१९०५ साली सचिद्रनाथ बसु व सुकुमार मित्र नावाच्या दोन क्रांतिकारी मित्रांनी एक लंबचौरस आकाराचा ध्वज बनविला. ह्या ध्वजावर वरचा भाग हिरवा, मधला पिवळा आणि खालचा भाग लाल होता. वरच्या हिरव्या पट्ट्यावर अखंड बंगालसहित आठ प्रांतांची प्रतिकं म्हणून आठ कमलाकृती दशविल्या होत्या, पिवळ्या पट्ट्यावर वंदे मातरम् ही अक्षरे देवनागरी लिपीत होती, खालच्या लाल पट्ट्यावर सूर्याचं प्रतीक आणि चाँदतारा होता. जवळजवळ या डिझाईन सारखाच एक राष्ट्रध्वज मॅडम भिकाईजी रस्तुमजी कामा यांनी २२ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनीमध्ये स्टुटगार्ट शहरात भरलेल्या 'इंटरनॅशनल काँग्रेस'मध्ये भारतातर्फे ठेवला होता. ह्या ध्वजावर लंबचौरस आकाराच्या वरच्या हिरव्या पट्ट्यावर आठ कमलपुष्पे स्पष्टपणे दाखविली होती, मधल्या पिवळ्या पट्ट्यावर वंदे मातरम् देवनागरी अक्षरे या शिवाय खालील पिवळ्या पट्ट्यावर हिंदूंचे सूर्याचे प्रतीक व मुसलमानांचं फक्त चाँदच प्रतीक दाखवले होते. परंतु त्यात तारा नव्हता.

काँग्रेसचा एक सेनानी व्यंकैया आंध्रमधील मछलीपट्टम् येथील उत्तम चित्रकार होता. त्याने महात्मा गांधीजींना आवडेल असा राष्ट्रध्वज देण्याचे ठरवले. त्याने २४ प्रकारच्या राष्ट्रध्वजांचा एक अल्बम गांधीजींना अर्पण केला. पण त्यांचे समाधान झालं नव्हतं. त्यानंतर व्यंकैयाने तीन तासात एक नवीन राष्ट्रध्वज गांधींना दाखवला. यामध्ये लाल पट्टा वर, मधला पट्टा श्वेतरंगाचा आणि खालचा पट्टा हिरव्या रंगाचा तसेच श्वेत पट्ट्यावर चरख्याचे प्रतीक होतं. राष्ट्रध्वजासाठी चरखा बाद केला तर तो ध्वज बलारीया, इटली, मेक्सिको किंवा पर्शियाच्या ध्वजाशी मिळताजुळता राहील आणि तो भारताचा राष्ट्रध्वज ठरणार नाही. भारतातील सर्वधर्मीय आणि काँग्रेसने २ एप्रिल १९३१ रोजी राष्ट्रध्वज कमिटी नेमली. या कमिटीत पंडित नेहरू, सरदार पटेल, अब्दुल कलाम आझाद, काका कालेलकर यांचा समावेश होता. मदनमोहन मालवीय यांनी पूर्ण ध्वज लाल रंगाचा असावा असे मत मांडले. त्यांचे हे मत स्वीकारून लाल रंगाच्या या ध्वजावर एका कोपऱ्यात ब्रिटिश युनियनजॅक प्रतीक ठेवण्यात आलं म्हणून ब्रिटिशांची गुलामगिरी दर्शविणारा हा राष्ट्रध्वज काँग्रेसच्या बहुसंख्य कार्यकर्त्यांनी हा ध्वज नाकारला. शेवटी आजच्या राष्ट्रध्वजाचा पूर्वज असा लंबचौरस ध्वज पसंत करून त्यात लाल रंगाऐवजी वरती भगवा रंग, मध्ये पांढरा रंग आणि त्यावर चरख्याचं प्रतीक आणि खालचा पट्टा हिरव्या रंगाचा असा राष्ट्रध्वज सर्वमान्य झाला. १९४२ च्या 'भारत छोडो' ह्या आंदोलनात या ध्वजाचा उपयोग करण्यात आला व जनतेने सुद्धा ह्या ध्वजाला पसंती दिली. त्यानंतर राष्ट्रध्वज समितीने राष्ट्रध्वजाच्या चरख्याच्या ठिकाणी सम्राट अशोकाच्या धर्मचक्राची स्थापना केली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी सकाळी १०.३० वाजता दिल्लीतील व्हॉईसरॉय हाऊस (म्हणजे आताचे राष्ट्रपती भवन) वर हा राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. तेव्हापासून आजतागायत या ध्वजामध्ये काहीही फरक करण्यात आलेला नाही आणि आता तो कोणीही बदलू शकणार नाही.

(संदर्भ - मराठी माणसं)
सौजन्य - आपले जग, सांगली
**शरद प्रजापती**

**निवेदन : आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणींकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत असते. हा अंक वर्गणी न घेता विनामूल्य सर्व भिडे कुलोत्पन्नांना वितरित करीत आहोत तरीसुद्धा ज्या कोणाला अंकासाठी आर्थिक हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी, मदत रोख वा धनादेशाद्वारे पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावे. धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावाने पाठवावे किंवा त्या खात्यामध्ये ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल.**

**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती - **TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**


**आम्ही भिडे** **अंक ४७ वा**

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे
कार्यकारी संपादक : श्री. दिलीप भिडे
संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रभाकर शंकर भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. मेघना भिडे, सौ. प्रिती भिडे, सौ. स्नेहल भिडे
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर



**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१


**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. (१) श्री. चंद्रशेखर निळकंठ भिडे, माभळे, रत्नागिरी. २) आशिष आशिष भिडे, नालासोपारा. (३) श्रीमती आकांक्षा आशिष धुंडीराज भिडे, नालासोपारा. (४) श्रीमती प्रभावती त्रिंबक भिडे, कल्याण, (५) श्री. उदय मधुकर भिडे, जुन्नर

# बालवैज्ञानिक

जून २०२१ मध्ये बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळामार्फत घेतलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये चि. प्रथमेश अमोल भिडे, रा. खेड, जि. रत्नागिरी याची बालवैज्ञानिक म्हणून निवड झाली. ह्याशिवाय त्याने रौप्यपदकही मिळविले. ह्या परीक्षेत लेखी, प्रात्यक्षिक, प्रकल्प मांडणी व तोंडी परीक्षा असे चार टप्पे असतात. ह्यामधील प्रकल्प मांडणी ह्या टप्प्यामध्ये ''प्लास्टिक वेष्टनाचे पर्यावरणारवर होणारे दुष्परीणाम व त्याला पर्यावरणपूरक पर्याय'' ह्या सादरीकरणानंतर दोन प्रकारच्या तोंडी परीक्षा घेण्यात आल्या. ह्या सर्व परीक्षेत चांगल्या प्रकारे उत्तर्ण होऊन, त्याने हे प्राविण्य मिळविले. कु. प्रथमेशचे वडील श्री. अमोल हे एका नामांकित कंपनीत पर्यावरण विभागात सिनीयर ऑफिसर असून आई सौ. आदिती ह्या खेड येथील न्यायालयात नोकरीला आहेत.



चि. प्रथमेश हा खेड येथील ज्ञानदीप विद्यामंदर येथे इ. ६वी मध्ये शिकत असून इ. ५वी मध्ये स्कॉलरशीप परीक्षेत त्याने २५८ मिळवून राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीमध्ये ७वर क्रमांक मिळविला. त्याला सायकलींग व पोहणे याचीसुद्धा आवड आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ह्याप्रमाणे लहान वयात बालवैज्ञानिक म्हणून झालेली निवड ही चुणूक दिसून येते. उपजत बुद्धी चांगली असली तरी आई-वडीलांचे संस्कारांना तितकेच महत्त्व आहे. चि. प्रथमेशला नित्युंदय गोत्रीय प्रतिष्ठान व समस्त भिडे परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा आशि भविष्यात त्याला उत्तमोत्तम यश मिळून त्याची विजयी पताका सर्वत्र अशीच झळकत राहो, ही सदिच्छा !

## नम्र सूचना

**ज्या कुलबंधू, भगिनींनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे' अंक मिळत नाही अथवा भिडे प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील व्यक्तींना संपर्क साधून आपला पत्ता व फोन नंबर द्यावा अथवा पत्राने कळवावे तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.**

| | |
|---|---|
| **प्रशांत भिडे, सातारा** | **ले.क. सुनिल भिडे, पुणे** |
| ७७७६०२०७७९ | ९६२३०१७४४४ |
| **सौ. संपदा भिडे, मुंबई** | **प्रदीप ज. भिडे, डोंबिवली** |
| ८३९६०६०९७९ | ९८९२५०४०४२ |

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

| | | |
|---|---|---|
| **जुलै** | श्री. नंदकुमार व सौ. निला ताम्हणकर, सांगली | ५.७.८० |

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा ?**

# भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जुलै

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव | १ |
| २. | सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे | १ |
| ३. | श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी | २ |
| ४. | श्री. शशिकुमार के. भिडे, पुणे | २ |
| ५. | कु. वैदेही अनिल भिडे, पुणे | ३ |
| ६. | श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे | ५ |
| ७. | श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण | ७ |
| ८. | श्री. जयराम भिडे, सोलापूर | ७ |
| ९. | कु. पवनी शार्दुल भिडे, पुणे | ७ |
| १०. | श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे | ८ |
| ११. | श्री अरुण महादेव भिडे, नाशिक | ११ |
| १२. | चि. अर्जुन विक्रम भिडे, पुणे | १३ |
| १३. | श्री. वि. कृ. भिडे, नाशिक | १४ |
| १४. | श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली | १५ |
| १५. | सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई | १५ |
| १६. | सौ. सुधा दत्तात्रय भिडे | १५ |
| १७. | सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई | १६ |
| १८. | श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली | १७ |
| १९. | श्री. अनिल वामन भिडे, पुणे | १७ |
| २०. | श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | २० |
| २१. | सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा | २२ |
| २२. | कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे | २३ |
| २३. | श्री. बळवंत भिडे, अंमळनेर | २३ |
| २४. | श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे | २३ |
| २५. | श्री. विनय विष्णू भिडे, पुणे | २४ |
| २६. | चि. कपिल गणेश भिडे, पुणे | २५ |
| २७. | सौ. स्मिता सतिश भिडे, मुंबई | २७ |
| २८. | सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे | २७ |
| २९. | श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे | २८ |
| ३०. | श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली | २८ |
| ३१. | श्री. श्रेयस श्रीकृष्ण भिडे, मालाड | ३० |
| ३२. | सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज | ३० |
| ३३. | सौ. आरती विक्रांत भिडे, पुणे | ३० |

## ऑगस्ट

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ | ०३ |
| २. | चि. वरद ओंकार जोशी, पुणे | ०४ |
| ३. | कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा | ०६ |
| ४. | श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे | ०६ |
| ५. | सौ. योगिनी माधव भिडे, पुणे | ०७ |
| ६. | सौ. स्नेहल सुनिल भिडे, पुणे | ०७ |
| ७. | चिं. ओंकार मिलिंद भिडे, पुणे | १० |
| ८. | सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई | ११ |
| ९. | श्री. अमित दिलीप भिडे, पुणे | १२ |
| १०. | श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर | १३ |
| ११. | श्री. निळकंठ भिडे, नाशिक | १३ |
| १२. | सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे | १४ |
| १३. | सौ. ऋता कौस्तुभ जोशी ठाणे | १५ |
| १४. | ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे | १५ |
| १५. | श्री. आशिष गोविंद भिडे, कल्याण | १५ |
| १६. | श्री. प्रशांत सदानंद भिडे, सातारा | १६ |
| १७. | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे | १८ |
| १८. | श्री. अमित सुभाष भिडे, मालाड | १८ |
| १९. | डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ | १९ |
| २०. | श्री. प्रणव प्रसाद भिडे, पुणे | २० |
| २१. | कु. मधुरा मिलींद भिडे, बडनेरा | २० |
| २२. | सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली | २१ |
| २३. | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | २१ |
| २४. | सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे | २१ |
| २५. | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | २२ |
| २६. | चि. अनय शुभानन भिडे, | २२ |
| २७. | डॉ. प्रमोद रामकृष्ण भिडे, डिचोली | २२ |
| २८. | सौ. गौरी प्रदीप भिडे, डोंबिवली | २३ |
| २९. | सौ. मृणाल श्रीकांत केळकर, डोंबिवली | २४ |
| ३०. | श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल | २६ |
| ३१. | श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली | २६ |
| ३२. | श्री. सुकृत सुभाष भिडे, सांगली | २६ |
| ३३. | श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली | २७ |
| ३४. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| ३५. | सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ | २८ |
| ३६. | सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे | ३० |
| ३७. | श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम | ३१ |
| ३८. | श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर | ३१ |

## सप्टेंबर

| | | |
|---|---|---|
| १. | कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली | १ |
| २. | श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली | २ |
| ३. | श्री. अनंत हरी भिडे, मालाड | २ |
| ४. | श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ५. | सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण | ३ |
| ६. | कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव | ४ |
| ७. | सौ. माधवी सारंग भिडे, सांगली | ४ |
| ८. | आर्या चारुदत्त भिडे, माभळे | ६ |
| ९. | श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे | ७ |
| १०. | श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण | ७ |
| ११. | मनश्री मंदार भिडे, चिपळूण | ८ |
| १२. | श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे | ८ |
| १३. | सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर | ९ |
| १४. | कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे | १० |
| १५. | सौ. अनघा अमित पटवर्धन, बदलापूर | १० |
| १६. | श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे | ११ |
| १७. | श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा | १३ |
| १८. | सौ. मानसी चारुदत्त भिडे, माभळे | १४ |
| १९. | सौ. हर्षदा व्ही. भिडे, रायगड | १५ |
| २०. | श्री. आनंद भिडे, मुंबई | १६ |
| २१. | सौ. लता नारायण भिडे, जबलपूर | १६ |
| २२. | श्री. विजय अनंत भिडे, ठाणे | १७ |
| २३. | सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे | १८ |
| २४. | कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली | १८ |
| २५. | श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे | १८ |
| २६. | श्री. सतीश दत्तात्रय भिडे, पुणे | २० |
| २७. | कु. बिल्वा अमित भिडे, पुणे | २१ |
| २८. | सौ. रेणुका केदार भिडे, पुणे | २२ |
| २९. | कु. गौरी विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| ३०. | चि. जयराज विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| ३१. | श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद | २५ |
| ३२. | कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई | २६ |
| ३३. | कु. सारंग संतोष भिडे, ठाणे | २६ |
| ३४. | श्री. चैतन्य भिडे, नाशिक | २६ |
| ३५. | श्री. रोहित विजय भिडे, ठाणे | २७ |
| ३६. | श्री. हेरंब प्रसाद भिडे, माभळे | २८ |
| ३७. | सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा | २९ |
| ३८. | श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे | २९ |
| ३९. | श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण | २९ |
| ४०. | सौ. मानसी विक्रम भिडे, पुणे | ३० |

**मी-माझं कुटुंब-माझे नातेवाईक या मर्यादित परिघाचं वर्तुळ ओलांडून दुसऱ्यांसाठी धडपडण्यात आनंद मानणाऱ्या सामान्यांमधल्या कर्तबगारांमधल्या कर्तबगारांची ओळख करून देणाऱ्या 'स्वतःपलीकडे' या सदरातून...**

# आमची माहेरवाशीण

बँक ऑफ इंडियाच्या कॅशियर पिंजऱ्यात बसून वाघासारखे गुरगुरत समोरच्या स्लीपवर तारीख किंवा सही नसेल तर डरकाळी फोडण्यासाठी सदा तत्पर असणाऱ्या बाई म्हणजे आरती कार्लेकर बाई ! होय हा अनुभव खूप लोकांनी घेतला असणार. आपला अकाऊंट नंबर, आजची तारीख किंवा सही कुठे करावी इतकं बेसिक नॉलेज काऊंटरसमोर येणाऱ्या डीग्री होल्डरला असलंच पाहिजे हा त्यांचा खाक्या ! फलाणा असेल मोठा श्रीमंत पण त्याच्या घरी. इथे बँकेत काही बेसिक रूल्स असलेच पाहिजेत हा शिरस्ता. हा नियम सर्वांनाच का ? नाही. अमूक बाई अगदी धुणीभांडी करतेय, भाजी, मासे विकतेय, पण बँकेची नियमित ग्राहक आहे तर तिला प्रसंगी तिच्या घरी जाऊन कसलीही मदत करायला हा पिंजऱ्यात गुरगुरत असलेला वाघ तेव्हा मऊ मांजर होतो; किंवा कासव होऊन जीवनशर्यत जिंकायला सहकार्य करतो. मराठीतून प्राथमिक शिक्षण घेतलेल्या नंतर पुणे-मुंबई इथे राहून आता कोकणात वेंगुर्लेकर होऊन अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या या धडाडीचं नांव सौ. आरती संजय कार्लेकर ! केरळ किंवा मध्यप्रदेशातून आलेला बँकेचा नवीन कर्मचारी वर्ग आधी या बाईंचा फॉलोअर होतो. कारण प्रत्येक टेबलावरील काम यांनी समजून घेतलेलं असतं. सहकार्य भावना तसेच हिंदी, इंग्रजीवर प्रभुत्व. एखाद्या मंदिरात सप्तशती किंवा अथर्वशीर्ष यातलं काहीही धडाधड संस्कृत यांच्या तुपाळ वाणीतून ऐकताना मन प्रसन्न होतं. एखादा गायनाचा कार्यक्रम असेल तर अगदी काळी चार पट्टीत सुंदर गीत या बाई आनंदाने गाऊन मैफिलीत चार चाँद लावू शकतात. तो कार्यक्रम आयोजित करण्यापासून पार पडेपर्यंत या तिथं असतील तर चार लोकांना कामाला लावून काम तडीस नेतील. हे मी कसं करू ? मला जमेल का ? असली पुळचट वाक्ये यांनी कधी बोलली पण नसतील. कोणतंही काम करताना ते कमीपणाचे नाही असं सांगत भेळ वाटप करणारे हौशी कुटुंब. वेंगुर्ला ते पुणे सुमारे ४१० किमी. अंतर स्वतः एकट्याने ड्राईव्ह करत जाणं आणि वय वगैरे केवळ आकडे असतात ते कधीही मोजत बसायचे नसतात. असली अचाट अफलातून कामं करणारी ही बाई खरंच किती ग्रेट असेल कल्पना करा ! कुठून येतो हा आत्मविश्वास ? ही धडाडी ? मराठी प्राथमिक शाळेत शिकून धुळे-औरंगाबाद-गोवा-देवगड-विजयदुर्ग असं सगळीकडे फ्री ड्राईव्ह रोमिंग कसं काय जमत असावं एका बाईला ?

आरतीताईंचं माहेरचं नांव विद्या यशवंत भिडे. कोकणातील देवगड तालुक्यातील नाडण येथील वैद्य श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे



यांची नात, अत्यंत बुद्धिमान, प्रचंड कर्तृत्ववान पण तापट अशा, वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी कमाई करण्याचा ध्यास घेऊन, दिवसा नोकरी व रात्रीची शाळा शिकून, गरिबीवर मात करीत जिद्दीने, मोठ्या उमेदीने स्वकर्तृत्व फुलविणाऱ्या, निग्रही आणि हेकेखोर वडिलांची, यशवंतराव भिडे यांची लाडकी लेक. अत्यंत सोशिकपणा अंगी बाणविलेल्या, अतिशय तरल बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व असलेल्या, सांगलीच्या कुसुम रघुनाथ खाडिलकरची तिच्याचसारखी घडलेली धोरणी, धूर्त मुलगी म्हणजे विद्या यशवंत भिडे. आरतीताईंना चार भावंडे. दोन मोठे आणि एक लहान भाऊ. पाचवी ते दहावी शिक्षण, पेटिट हायस्कूल, संगमनेर इथं झालं. अनेक वक्तृत्व, निबंध, पाठांतर स्पर्धा, हस्ताक्षर आणि रांगोळी स्पर्धा सुद्धा गाजवल्या. नववी शिकेपर्यंत या बालपणीच्या विद्याला पुरुषांच्या दादागिरीचा, स्त्रीवर हुकुमत गाजवण्याच्या पुरुषी अहंकाराचा प्रचंड संताप येत असे. अकरावी, बारावी कॉमर्स संगमनेर कॉलेजला झाले. अकरावीत असतानाच 'न स्त्री सर्वम् स्वातंत्र्यम अर्हती' या राज्यस्तरीय, संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत पुणे येथे द्वितीय पारितोषिक विजेती म्हणून मोठा सन्मान मिळाला. नेवासे येथे ज्ञानेश्वरांचे पसायदान, यावरील वक्तृत्व स्पर्धा झाली व विजेतेपद लाभले. दहावीला ७९ टक्के व बारावी कॉमर्सला ७१ टक्के मिळविलेली आपली मुलगी इंग्लिश मिडियमला शिकू दे, असे वडिलांच्या मनात आले आणि मुंबई गाठली गेली. एम.एल. डहाणूकर कॉलेज, विलेपार्ले इथे पहिले वर्ष तर दुसरे, तिसरे वर्ष रुपारेल कॉलेज, माटुंगा इथे पूर्ण केले. सेकंड क्लासमध्ये बी.कॉम. पूर्ण. बारावी पर्यंत मराठी माध्यमात शिक्षण झाल्याने फक्त एफ.वाय.चे वर्ष अवघड गेले. खूप अभ्यास करावा लागला. डिक्शनरी सोबत घेतल्याशिवाय इंग्रजी शब्दांचा अर्थ समजला नाही. पण प्रचंड इच्छाशक्ती आणि अभ्यासाची जिद्द या दोन्हींमुळे यश मिळाले. मातृभाषेत शिकलेल्या माणसाला प्रचंड आत्मविश्वास असतो असे आरतीताई म्हणतात. निर्भिडपणे व्यक्त होता येणे त्यासाठी अन्य कसल्याही कुबड्या न लागणे, विचारांची दिशा आणि ध्येय निश्चितीसाठी मातृभाषेचे माध्यम खूपच जास्त उपयोगी पडते. असे त्या नोंदवितात. इंग्रजी भाषा आणि व्याकरण निश्चित शिकले पाहिजे आणि इंग्रजी रोखठोक बोलता सुद्धा आले पाहिजे हे नमूद करायला त्या विसरत नाहीत. शिक्षणाच्या निमित्ताने प्रत्येक आई-बापाने आपल्या मुलाला हॉस्टेलला किंवा अन्य पेईंग गेस्टसारखी सोय करून, जरूर आपल्यापासून लांब ठेवावे, हे ठाम मत त्या मांडतात. त्या म्हणतात,

फक्त मुलांवर बारीक लक्ष असणे आवश्यक. या काळात पालकांनी आपल्या मुलांशी दोस्ती करावी आणि उत्तम मैत्री निभवावी जी मुलांना सजगतेने घडण्यासाठी उपयुक्त ठरते. आई-वडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी लग्न केले असे त्या विनम्रपणे सांगतात. विवाहानंतर पुणे मुक्कामी नोकरी केलीच पाहिजे, असा पतीहट्ट नसताना एकूण परिस्थितीचा अंदाज घेत, घरखर्चाला हातभार लावण्यासाठी नोकरी करावी म्हणून बँकेच्या परीक्षा देण्यास सुरुवात केली. पुत्रप्राप्ती मागोमाग वर्षातच बँक ऑफ इंडियामध्ये क्लार्कच्या पदावर नोकरी मिळाली. प्रथम पासूनच नोकरीत फार प्राविण्य मिळविण्याचा ध्यास नव्हता. आई-पत्नी व सून या भूमिका उत्तमपणे पार पाडणे इतकेच ध्येय निश्चित होते. सासरची एकही तक्रार करायची नाही तर सर्व कुटुंब सदस्य जसे आहेत तसे, प्रेमाने स्वीकारायचे हा आईने दिलेला वसा, कर्तव्य कठोरतेने पालन केला. अन्याय सहन करणे, रक्तातच नव्हते आणि समोर कोणी दुसऱ्या कोणावर अन्याय केला तरी तो सहन होत नसे. बँकेची नोकरी कौशल्यपूर्ण सांभाळत असतानाच बदलीच्या कारणावरून बँकेतील युनियनच्या पदाधिकाऱ्यांबरोबर यशस्वी लढाई झाली. आरतीताई कालांतराने बदलीनंतर पती व दोन मुलांसह कोकणात, सावंतवाडीत आल्या. नऊ खोल्यांचे भाड्याचे घर, अगदी मध्यवस्तीत मिळून गेले आणि समाजोपयोगी काम करण्याची संधी घराचा दरवाजा ठोठावत, समोर उभी ठाकली. हे ताईचे मत. १९-२० वयोगटातली बी.ए.एम.एस. शिकणारी चार-पाच मुले पेईंगगेस्ट म्हणून ठेवली. याच सुमारास, योगायोगाने, फसविल्या गेलेल्या, आत्महत्येचे विचार करणाऱ्या, काही त्रासलेल्या मुली भेटत गेल्या आणि त्यांना धीर देत, छप्पराचा आणि घासभर अन्नाचा आधार दिल्याने, त्या मुली कार्लेकर कुटुंबात रममाण होत गेल्या. ताईच्या दोन मुलांना समाजातील एक दोन नाही तर क्रमाक्रमाने सदतीस बहिणी-ताया मिळाल्या. कुमारी माता झालेल्या, फसविल्या गेलेल्या, गरिबीने नाडलेल्या, एड्स झालेल्या, अशा किती मुली स्वयंपाक शिकल्या, कोणी टायपिंग तर कोणी शिलाई मशीन. कोणी उत्तम भांडी घासण्याची काम करत होत्या तर काहीजणी फक्त दुःख विसरण्यापुरत्याच आलेल्या होत्या. अभिमानाने ताई सांगतात, त्यांच्याकडे राहून, बाहेर पडलेल्या एकाही मुलीने आत्महत्या केली नाही. त्यांचे ते नकारात्मक विचार सगळे नाहीसे होऊन, त्या आयुष्याकडे मोठ्या आशेने पाहू लागल्या. महिलांनी आपला प्रपंच नेटका करूनच, नोकरी निभवावी हे ताईंचे ठाम मत. नोकरीतील तडजोडीमुळे घराकडे दुर्लक्ष कधीच करू नये व आपली आई व पत्नीची भूमिका उत्तम प्रकारे प्राधान्याने केली पाहिजे. ताई म्हणतात, विवाह संस्थेवर व मार्गदर्शक रूढी-परंपरांवर गाढ विश्वास ठेवावा व जोडीदाराबरोबर क्षण न् क्षण आनंदात व समाधानात व्यतीत करावा. स्वतःच्या गुणांना अवास्तव महत्त्व देऊन, आपल्या सोबत्याच्या उणिवा, दोष यावर भाष्य करून किंवा त्याच गुणदोषांचा विचार करत हाती आलेल्या, जगण्याच्या क्षणांची नासाडी करू नये, हेच तत्त्व अंगीकारावे. आईच्या भूमिकेतून आपल्या पोटच्या मुलांना सुद्धा असे सकारात्मक संस्कार द्यावेत आणि समयसूचकतेबरोबरच तडजोड वृत्ती शिकवावी. पत्नीची भूमिका अत्यंत आनंददायी व प्रेरणादायी असली पाहिजे. मातृभाषेचा, मातृभूमीचा मान आपणच ठेवला पाहिजे. मुलांना सुद्धा त्यांची मातृभाषा समृद्ध करण्यासाठी लेखन, वाचन, श्रवण या विविध कला शिकवल्या पाहिजेत. मुलांची जडणघडण ही आई-वडिलांच्या प्रेमळ सुसंवादातून आणि त्यांच्या आचरणशुद्ध वर्तनावर, कृतीवर कर्मावरच जास्त अवलंबून असते, हे विसरून चालणार नाही. आई वडील होणे, म्हणजे एक विशेष पदाधिकार मिळवणे आहे याचे भान पालकांनी ठेवले तरच नवीन पिढी उत्तम प्रकारे घडू शकेल असे आरतीताई नमूद करतात. ज्युनिअर कार्लेकर मंगेश, उत्तम क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट झाला आणि आज समाजाची सेवा करत आहे. तर मुलगी मानसी हिला सप्तसुरांनी साथ दिल्याने ती उत्तम गायिका झाली, कॉम्प्युटर पदवीधर झाली आणि आज तिच्या दोन मुलांसह पती व सासूसासऱ्यांसोबत संसार करीत आहे. नोकरीत ३५वर्षे पूर्ण झाल्यावर आरतीताई बँक अधिकारी झाल्या. आजपर्यंतच्या जीवनकार्याचे श्रेय त्या आई वडिलांच्या संस्काराला देतात. भगवान श्रीकृष्णाने गीतेत सांगितलेल्या स्थितप्रज्ञतेला आत्मसात करत समाधानाने आयुष्याच्या पुढील टप्प्यावर असलेल्या आरतीताईंना सलाम.

(सौजन्य साप्ताहिक किरात, वेंगुर्ले)


## आयुष्याचे सूत्र

नकोच चिंता नको भीतीही सक्षम व्हा रे  
भविष्य घडवू चला उद्याचे आपण सारे  
मस्त राहा स्वस्थ राहा कशाला हवी चिंता  
आपणच आहोत आपल्या आयुष्याचा अभियंता  
जरी असेल खडतर जगण्याचा पथ  
आयुष्याच्या प्रवासात हवी प्रयत्नांना परिश्रमाची साथ  
कपाळावरील अपयशाची रेघ जेव्हा अलगद पुसू  
तेव्हा यशाचे समाधान आणी चेहऱ्यावर वेगळेच हसू  
दुःखातच कळत असते सुखाचे महत्त्व  
पार करुनी खाचखळगे  
निर्मूया नवे अस्तित्व  
प्रतिदिन असे हा सण नवा जगण्याचा  
शोधूया लपलेला सैनिक या मनाचा  
आखू आपण दिनाचे नवे धोरण  
यशाच्या दाराला बांधू एकीचे तोरण

– **करुणा भिडे,** डोंबिवली

# लग्नानंतरची ५० वर्षे

१९६१ साली मी बी.एस्सी. झाल्यानंतर पुण्याहून माझ्या मुंबईतल्या मोठ्या बहिणीकडे गेले. दुसऱ्याच दिवशी माझ्या मेव्हण्यांचे (कै. अण्णा फाटक) मित्र आले होते. त्यांनी माझ्यासाठी चेंबूरच्या शरद गोगटे यांचे स्थळ सांगितले. ते म्हणाले की मुलगा एम.एस्सी. असून भारत सरकारच्या भाभा अशुसंशोधन केंद्र (बी.ए.आर.सी.) मध्ये नोकरीला आहे. गोगट्यांना पत्रिका बघायची होती. म्हणून अण्णा चेंबूरला त्यांच्याकडे पत्रिका देऊन आले. ४-५ दिवसांनी पत्रिका जमत असल्याचे त्यांनी कळवले व एका रविवारी सकाळी ९ वा. दाखवण्याचा कार्यक्रम ठरवला.



आम्ही ठरल्याप्रमाणे सकाळी ९ वा. चेंबूरला गोगट्यांच्या घरी पोहोचलो. माझी भावंडे व (होणारी) पुतणेमंडळी समवयस्क असल्याने खेळण्यात रमली. बघण्याचा कार्यक्रम आटोपल्यावर ती. अण्णा माझ्या भाच्यांना बोलावताना पटकन बोलून गेले, परत यायचेच आहे तुम्हाला इथे खेळायला ! आणि खरंच, ५-६ दिवसांनी गोगट्यांकडून पसंती कळविणारे पत्र आले. १२ मे १९६२ रोजी आमचे पुण्यात लग्न झाले. १९६४ साली चि. शिरीषचा जन्म झाला तर १९६७ साली चि. शुभदाचा.

आम्हाला दोघांनाही फिरण्याची हौस असल्यामुळे मुले वरच्या इयत्तेत जाईपर्यंत आम्ही उन्हाळ्यात महिना महिना माथेरान, महाबळेश्वर किंवा लोणावळ्याला जाऊन राहायचो. मुलांच्या पुढच्या इयत्तेचा थोडाफार अभ्यासही घ्यायचो. मुले मोठी झाल्यावर एकदा आम्ही दोघेच सोलापूरला राहून जवळपासची अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर अशी तीर्थक्षेत्रे फिरून आलो. मुलांचे शिक्षण पूर्ण होऊन नोकरीला लागल्यावर आम्ही एकदा गोव्याची व एकदा दक्षिण भारताची सहल करून आलो. मधल्या काळात आम्ही दोघेच २१ दिवसांची भारत दर्शन म्हणजे गुजरातमधील गिरनारपासून उत्तरप्रदेश पर्यंतचा भाग बघून आलो. ह्यांच्या निवृत्तीच्या काही महिने अगोदर माझे मोठे दीर व जाऊबाईंबरोबर नेपाळ, सिक्कीम, दार्जिलिंग, काशीविश्वेश्वर व ओरिसा अशी मोठी ट्रिप 'केसरी'बरोबर केली.

सर्व सहलींच्या गोड आठवणी आजही आमच्या स्मरणात आहेत. आता आम्हा दोघांचेही वय ८० च्या पुढे आहे. आता प्रवास काही होत नाही, जुन्या आठवणींमध्येच रमतो ! मुले उत्तम शिकली, नोकरीत यश मिळविले, व्यवस्थित संस्कार करून आपापल्या मुलांना वाढविले, नातवंडेही आपापल्या क्षेत्रात यशस्वी झाली, नातसूनही पाहिली. 'नांदा सौख्यभरे' हा आम्हा उभयतांना आमच्या आई-वडिलांनी दिलेला आशीर्वाद प्रत्यक्षात आला, ह्यातच कृतकृत्य वाटते !

**- सौ. शैलजा शरद गोगटे,** +९१८४२४८६५५७१
(पूर्वाश्रमीची पुष्पलता लक्ष्मण भिडे)

# मागे वळून बघताना

घराला कुलुप लावून पडताना नेहमी मागे वळून बघावे की घरातले सर्व दिवे, गॅस, पंखे, खिडक्या बंद आहेत ना ? अन्न झाकून ठेवले आहे ना ? थोडक्यात सगळा बंदोबस्त नीट केला आहे ना ? कुठूनही निघताना नेहमी मागे वळून बघावे की आपण आपले सर्व सामान न विसरता व्यवस्थित घेतले आहे ना ? कोणतेही काम पूर्ण केल्यावर नेहमी मागे वळून बघावे की सर्व काम व्यवस्थित पूर्ण झाले आहे ना ? आपल्या गोष्टी व्यवस्थित होण्यासाठी आपण नेहमीच्या जीवनात अशी मागे वळून बघण्याची सवय लावून घेतो.

आज मीही असेच मागे वळून बघणार आहे. काही सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक घटनांकडे, त्यात झालेल्या बदलांकडे. अर्थात माझे मागे वळून बघणे माझ्या नजरेतून, माझ्या अनुभवांवर आधारित असेल.

माझ्या लेकीचे जून २०१९ मध्ये लग्न झाले. आमच्यावेळी स्थळे बघण्यासाठी वधू-वर सूचक मंडळात जावे लागत असे. उतरवून आणलेल्या स्थळांना पत्राने आपली माहिती, फोटो पाठवावे लागत किंवा त्या स्थळांच्या घरी माहिती, फोटो देण्यासाठी जावे लागे. कारण त्यावेळी कॉम्प्युटर, इंटरनेट, स्मार्टफोन नव्हतेच. लँडलाईनसुद्धा सर्रास सगळ्यांकडे नसायचे. आता मात्र घरबसल्या वधू-वर सूचक मंडळांच्या वेबसाईटवरून स्थळांची माहिती मिळते. साधारण फोनवरूनच स्थळांशी संपर्क साधला जातो. आपली माहिती व्हॉटस्अप, ई-मेल यावरून पाठवता येते. थोडक्यात पूर्वी स्थळे बघण्यासाठी जोडे झिजवावे लागत. आता कॉम्प्युटरवर डोळे आणि बोटे झिजवावी लागतात. मागे वळून बघताना अजून एक महत्त्वाची गोष्ट जाणवते ती म्हणजे पूर्वी घटस्फोटांचे प्रमाण त्यामानाने कमी होते. त्यामुळे मुलांना किंवा मुलींना लग्न करताना आपले जमेल ना ? आपला घटस्फोट होणार नाही ना ? अशी भीती वाटत नसे. आजकाल मात्र लग्न करतानाच मुलांच्या किंवा मुलींच्या मनात ही भीती डोकावताना दिसते. पूर्वी लग्नात नवऱ्या मुलीची बहीण, मैत्रीण किंवा वहिनी असेच कोणीतरी नवरीला साडी नेसवत, तिचा मेकअप करत. आता मात्र त्यासाठी ब्यूटीपार्लर चालवणारी व्यक्तीच लागते. डिजिटल फोटोग्राफीमुळे आजकाल फोटोज सीडीमध्ये मिळतात. साधारण प्रत्येकजण समारंभात आपल्या स्मार्टफोनवर फोटोज काढू शकतो. इंटरनेटमुळे ते फोटोज एका क्लीकवर जगाच्या कानाकोपऱ्यात पाठवू शकतो. पूर्वी फोटोजचा रोल संपल्यावर डेव्हलपिंगला देता येत असे.

नंतर फोटोजच्या प्रिंटस् आणि निगेटिव्हज् मिळत. संगणकीकरणामुळे आजकाल कंपन्यांच्या वर्क कल्चरमध्ये खूप फरक पडला आहे. आता मिटिंग्जसाठी एम्प्लॉइजनी एकाच केबिनमध्ये जमणे आवश्यक राहिलेले नाही. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून फिजिकली वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या व्यक्तींची व्यवस्थित मिटिंग होऊ शकते. ई-मेलद्वारे कागदपत्रे शेअर करता येतात. पूर्वी कंपनीत काम करण्यासाठी एम्प्लॉईजूना कंपनीत फिजिकली हजर राहावे लागत असे. आता मात्र एम्प्लॉईजना 'वर्क फ्रॉम होम' करणेही शक्य झाले आहे.

सन २०२० च्या सुरुवातीला कोरोनाची महाभयंकर साथ आली. आजार पसरण्याचा वेग जबरदस्त होता. त्यावेळी अनेक कंपन्यांनी त्यांच्या एम्प्लॉईजना 'वर्क फ्रॉम होम' करण्याची सुविधा प्राप्त करून दिली. त्यामुळे कोरोनाचा प्रसार रोखण्यास मदत तर झालीच त्याचबरोबर कंपन्यांचे कामही ठप्प झाले नाही. सध्या बऱ्याचशा कंपन्यांमधून एम्प्लॉईजना कामावरून काढणे ही गंभीर गोष्टसुद्धा रुटीन झाली आहे. त्यामुळे कंपनीत नोकरी करत असताना आपल्याला कामावरून कधीही काढले जाऊ शकते ही भीती प्रत्येक एम्प्लॉईजच्या मनात असते. पूर्वी काही गंभीर कारण असेल तरच एम्प्लॉईजना कामावरून कमी केले जाई. त्यामुळे एम्प्लॉइजना काम करताना मानसिक स्वास्थ्य असायचे. शैक्षणिक क्षेत्रातसुद्धा आता खूपच फरक पडला आहे. पूर्वी मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी एकाच ठिकाणी समोरासमोर असणे आवश्यक असायचे. आता इंटरनेटवर विद्यार्थ्यांना कितीतरी शिक्षकांच्या लेक्चर्सचे व्हिडिओज् उपलब्ध असतात. विद्यार्थी त्यांच्या सोईप्रमाणे ही लेक्चर्स ऐकू शकतात, बघू शकतात. कोरोनाच्या काळात कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी सर्व शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. त्यावेळी ऑनलाईन शिक्षणाद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहिले. वर्ष वाया गेले नाही. नृत्य, गायन यांसारख्या कलासुद्धा ऑनलाईन शिकविल्या गेल्या. पूर्वीच्या काळी कलाक्षेत्रात बरीच तपश्चर्या केल्यावर कलाकारांना प्रसिद्धी मिळे. ती टिकणारी असे. आजकाल रिॲलिटी शोजूमुळे कलाकारांना तात्काळ प्रसिद्धी मिळते. पण बऱ्याचदा ती क्षणभंगुर असते. नंतर त्यातले काही कलाकार काळाच्या ओघात कुठे गडप होतात ते कळतही नाही.

आपल्या कौटुंबिक व्यवस्थेतसुद्धा आता खूप फरक पडला आहे. बऱ्याच ठिकाणी विभक्त कुटुंब पद्धती, घरातील स्त्री व पुरुष दोघांचे नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर, परदेशी असणे यांमुळे वृद्धांचे प्रश्न गंभीर होत आहेत. त्यावर वृद्धाश्रम हा एक पर्याय निघाला आहे. पूर्वी वृद्धाश्रम नव्हतेच. घरातील माणसेच वृद्ध लोकांची शेवटपर्यंत सेवा करत, काळजी घेत. अर्थात्, अगदी पूर्वी पाळणाघरेही नव्हती. मला तर वाटते पाळणाघराच्या बीजाला वृद्धाश्रम हे आलेले फळ आहे. क्रीडा जगतातही आता खूप फरक पडला आहे. पूर्वी सामन्यांमध्ये अंपायर देईल तोच निर्णय फायनल समजला जाई. आता खेळाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असते. त्यामुळे जर खेळाडूला अंपायरच्या निर्णयाविरुद्ध अपील करायचे असेल तर ते खेळाडू योग्य मार्गाने करू शकतो. अशा वेळी आवश्यकतेप्रमाणे खेळाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग बघून परत फायनल निर्णय दिला जातो. मनोरंजन क्षेत्रातसुद्धा आता खूप बदल झाले आहेत. पूर्वी टी.व्ही.वर एकच नॅशनल चॅनेल होता. दिवसातील काही ठरावीक वेळच कार्यक्रमाचे प्रक्षेपण होत असे. आता टी.व्ही.वर अनेक चॅनेल्स उपलब्ध असतात. काहींचे प्रक्षेपण २४/७ असते. आता तर इंटरनेटच्या मदतीने प्रेक्षक आपल्या आवडीचे अनेक कार्यक्रम आपल्या सोईप्रमाणे बघू शकतात. आता कोरोनाकाळात जेव्हा चित्रपटगृहे व नाट्यगृहे बंद होती तेव्हा अनेक कलाकारांनी आपल्या कलेचे व्हिडिओज् इंटरनेटवर अपलोड करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. खरंच, मागे वळून बघायचे ठरवले आणि कितीतरी क्षेत्रांत बदल झाले आहेत हे जाणवले. अर्थात सर्व बदलांचा उल्लेख शक्य नाही. अजून साधारण २५-३० वर्षांनी जर आपल्या पुढच्या पिढीने असेच मागे वळून बघितले तर तिलाही अनेक बदल जाणवतील. काही गोष्टी बदलल्या असतील किंवा काही जुन्याच गोष्टी नवीन रूपात परत येतील. कालाय तस्मै नमः। हेच खरे !

**– सौ. योगिनी मा. भिडे**
मो. ७५८८२३५८८०

# पु. ल. देशपांडे – एक आठवण

- चंद्रकांत गोविंद भिडे, दादर.
०२२-२४३८०५६०

माझी आणि पु.ल. देशपांडे यांची भेट १९७४ च्या सुमारास पहिल्यांदा दादरला शिवाजी पार्कवर भरलेल्या 'शिवसृष्टी' प्रदर्शनात झाली. त्यावेळी मी बाबासाहेब पुरंदरे यांच्याबरोबर 'शिवसृष्टी' प्रदर्शनासाठी काम करायचो. प्रदर्शनासंबंधीच सर्व टाइपिंगचं काम मी करायचो. शिवाजी मंदिरमध्ये ऑफिस होतं. माझे स्नेही प्रसिद्ध संगीतकार श्री. श्रीकांत ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर प्रदर्शन दरम्यान प्रथम माझी पुलंशी ओळख करून दिली. श्रीकांतजी पुलंना म्हणाले, भाई हा चंदू भिडे, संगीत, चित्रपट आणि नाटक प्रेमी. क्लासिकल संगीत जास्त आवडतं आणि हो, हा संगीतकार शंकर-जयकिशन यांच्या संगीताचा Encyclopedia आहे आणि दोघांचा चांगला दोस्त आहे. आज जयकिशन नाही पण शंकरशी अजून चांगले संबंध आहेत. मी त्याला 'शंकर-जयकिशन भिडे' म्हणतो. ज्या दिवशी भेट झाली त्यावेळी मी क्रीम कलरचा झब्बा आणि पांढरा लेंगा घातला होता. गळ्यात रुद्राक्षाची माळ घातली होती. भुरे केस मानेवर रुळलेले होते. पुलं म्हणाले, भिडे जयकिशनसारखे एकदम स्मार्ट दिसताय. मी काय बोलणार ? फक्त हसलो. त्यानंतर ७/८ वेळा क्लासिकल गाण्याच्या मैफिलीमध्ये त्यांची भेट झाली होती. दरम्यान ८/१० वर्षात त्यांची भेट झाली नव्हती. पुलंचं चित्र टाईपरायटरवर काढण्याचा विचार मनात आला. मला हवं तसं चित्र मिळाल्यावर २/३ दिवसांत चित्र पूर्ण केलं. त्याच्या झेरॉक्स कॉपीज

काढून ठेवल्या. पुण्यात जाऊन ते चित्र पुलंना दाखवण्याचं ठरवलं. महिन्याभराने पुण्याला गेल्यावर आमच्या बँकेच्या झोनल ऑफिसमध्ये माझ्या मित्राकडे गेलो असता त्याला म्हटल पुलंचा टेलिफोन नंबर मिळेल का ? तेव्हा त्यांनी एकाला बोलावलं आणि पुलंच्या नंबराविषयी विचारलं. थोड्यावेळाने त्यांनी पुलंचा नंबर दिला. मित्रांनी फोन लावला तेव्हा माझा मित्र म्हणाला चंदू बोल, पुलंच बोलतायत. मी त्यांना म्हटलं, भाई नमस्कार. मी चंद्रकांत भिडे बोलतोय. मी पुण्यात ४/५ दिवसासाठी आलोय आणि तुम्हाला भेटायचंय. खूप वर्षांपूर्वी दादरलां शिवाजी पार्कवर भरलेल्या 'शिवसृष्टी' प्रदर्शनात संगीतकार श्रीकांत ठाकरे यांनी तुमच्याशी ओळख करून दिली होती. तेव्हा पुलं म्हणाले, एक मिनिट तुम्ही भिडे म्हणजे शंकर-जयकिशन भिडे का ? तेव्हा मी चाट पडलो आणि हो हो मीच तो. मी त्यांना म्हटलं तुमचं चित्र मी मॅन्युअल टाईपरायटरवर काढलं आहे ते तुम्हाला दाखवायचंय. मी पुण्यात ४/५ दिवस आहे तेव्हा तुमच्या सवडीने केव्हा येऊ चित्र दाखवायला ? तेव्हा ते म्हणाले, भिडे आजच या संध्याकाळी ५.३० ला. त्यांनी पत्ता सांगितला कसं यायचं ते सांगितलं. तो दिवस होता २६ नोव्हेंबर, १९९०. पुलंकडे जायचं म्हणून मी जाम खूश होतो. त्यांच्यासाठी एक खास बुकमार्क तयार केलं होतं. त्यावर १०/१२ इंग्रजी सुभाषिते टाइप केली होती. जाताना एक सुंदर पेन विकत घेतलं होतं. संध्याकाळी ५.३० च्या सुमारास त्यांच्याकडे गेलो तेव्हा ३/४ पाहुणे आले होते. ते जाण्याच्याच तयारीत होते. पुलंनी मला बघितलं आणि म्हणाले भिडे ना ? या आत बसा. पाहुणे गेल्यावर पुलं म्हणाले, काय म्हणता शंकर जयकिशन भिडे ? मी म्हटलं, एकदम मजेत. पुलंनी सुनीताबाईंशी माझी ओळख करून दिली. मी पुलंना टाईपरायटरवर काढलेल्या चित्रांच्या झेरॉक्स कॉपीजचं बाऊंड केलेलं पुस्तक दाखवलं. त्यांना म्हटलं हे पुस्तक मी तुम्हाला, व.पु. काळे, मारिओ मिरांडा आणि आर.के. लक्ष्मण यांना अर्पण केलं आहे. पुलंनी माझं मनोगत वाचलं, सर्व चित्रे बघितली आणि पुस्तकाच्या सुरुवातीच्या एका कोऱ्या कागदावर त्यांचा अभिप्राय लिहिला. त्यांनी चित्रे कशी काढता ? कुठल्या कीजचा वापर करता, एक चित्र काढायला किती वेळ लागतो ? असे अनेक प्रश्न विचारले. अतिशय प्रेमाने बोलले. चहा झाला. आग्रहाने फ्रिजमध्ये स्टीलच्या डब्यात ठेवलेले डाळींबाचे दाणे खायला दिले. त्यांनी पुस्तकातील एक चित्र दाखवलं आणि मला म्हणाले, भिडे हे चित्र काय आहे ? मी त्यांना म्हटलं, टाइम्स ऑफ इंडियानी लक्ष्मण यांच्या कार्टून्सवर एक पुस्तक छापलं आहे. त्याच नांव आहे Eloquent Brush. या पुस्तकाची किंमत जास्त आहे म्हणजे कॉमन मॅन वर पुस्तक आणि कॉमन मॅन विकत घेऊ शकत नाही. मी ब्रशमध्ये मॅन काढला आणि Priceless Eloquent असा कॅप्शन लिहिला. तेव्हा पुलं म्हणाले भिडे एक असं चित्र काढा लक्ष्मण साहेबांच्या हातात ब्रश आहे आणि त्या ब्रशनी कॉमन मॅनला बाजूला सारलं आहे आणि त्यावर Common man - Brushed Away असा caption लिहा. काही दिवसांनी टाईम्सच्या ऑफिसमध्ये जेव्हा लक्ष्मण साहेबांना भेटलो तेव्हा त्यांना हा किस्सा सांगितला तेव्हा ते हसले आणि मला म्हणाले Mr. Bhide, give my regards to him. निघताना पुलंना म्हटलं, भाई, घरी तुमच्या कॅसेटस दररोज ऐकतो त्यामुळे तुम्ही आमच्या घरी वावरत आहात असं वाटतं. त्यांच्यासाठी खास तयार केलेलं बुकमार्क त्यांना दिलं आणि म्हटलं तुम्ही जेव्हा पुस्तक वाचाल तेव्हा खूण म्हणून या बुकमार्कचा वापर करा. त्यांना माझ्याकडून एक सुंदर पेन भेट म्हणून दिलं आणि म्हटलं, भाई तुम्ही नेहमी चांगल्या कामासाठी देणग्या देता, वाचकांच्या पत्रांना उत्तरं देता तेव्हा या पेनचा वापर करा. त्यांना म्हटलं, भाई लेखकाला लेखणी शिवाय दुसरं काही प्रिय असेल असं मला वाटत नाही. तेव्हा पुलं म्हणाले, भिडे क्या बात है ? आणि म्हणाले, जरूर तुम्ही दिलेल्या लेखणीचा वापर करीन. मला हळूच म्हणाले, भिडे पेन खूप महागातलं दिसतंय तेव्हा मी त्यांना म्हटलं, भाई तुम्ही माझे एक आवडते लेखक आहात तुमच्यासाठी हे काहीच नाही. माझ्या आयुष्यातील ते एक दीड तास मी माझ्या आठवणीच्या कप्प्यात अगदी जपून ठेवले आहेत.

# आपला माणूस

कर्मण्ये वाधिकारस्ते मां फलेषू कदाचन ! ह्या उक्तीप्रमाणे फलाची अपेक्षा न करता निस्वार्थीपणे व उत्तम कार्य करुन आपला समाजाला कसा उपयोग होईल असे ध्येय ठेवून काही लोक आपल्या आयुष्यात मार्गक्रमण करीत असतात. असे एक तरुण, मितभाषी, कर्तृत्ववान आणि बहुगुणी व्यक्तीमत्त्व म्हणजे श्री. राजेंद्र महादेव भिडे, रा. दादर, मुंबई. ते स्वतः ऑटोमोबाईल इंजिनिअर असून एअरफोर्समधून नोकरी निवृत्त झाल्यानंतर मुंबईमध्ये एका खाजगी कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे मूळ गांव संगमेश्वर जवळील माभळे. भिडे प्रतिष्ठानच्या सौ. संपदा ह्या त्यांच्या पत्नी आहेत. सन २०१३ मध्ये झालेल्या भिडे संमेलनात यांची ओळख झाली आणि आजपावेतो निष्ठेने आणि निस्वार्थीपणे प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये उत्स्फूर्तपणे झोकून देऊन कार्य करीत आहेत, ह्याचा आम्हा भिडे परिवाराला अभिमान आहे.



श्री. राजेंद्र भिडे एकदा घेतलेली जबाबदारी पूर्ण केल्याशिवाय सोडत नाहीत. प्रतिष्ठानसाठी कार्यरत राहताना आलेली अडचण असो की वार्षिक सभा, संमेलन असो तसेच इतर कार्यक्रमांमध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. एका संमेलनात हॉलची सफाई करणारे लोक वेळेवर येऊ शकले नव्हते, त्यामुळे संमेलन वेळेवर होईल की नाही याबद्दल सर्वांना साशंकता असताना श्री. राजेंद्र भिडे यांनी साफसफाईची सर्व व्यवस्था करुन संमेलन वेळेवर सुरू होण्यास मोलाची मदत केली. कोणत्याही कामाची जबाबदारी स्वीकारून ते पूर्ण करण्याकडे त्यांचा मानस असतो. एक मार्गदर्शक म्हणून प्रतिष्ठानला त्यांचा सल्ला मोलाचा ठरतो. प्रतिष्ठानमध्ये कोणतेही पद नसताना आणि प्रसिद्धीपासून अलिप्त असलेल्या परंतु आपली नोकरी, घर सांभाळून सामाजिक बांधिलकी जोपासणऱ्या आपल्या माणसाला मानाचा मुजरा !

शब्दांकन : **दिलीप भिडे**

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक १४**

# रि-युनियन

**- सौ. वृषाली म. भिडे,** दादर
९८२१२५७८७७



बाल्यावस्था, यौवनावस्था व वृद्धावस्था ह्या माणसाच्या जीवनातल्या अटळ अवस्था आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक, प्रगतीशील व स्थिर अशाही तीन अवस्था आहेत. बाल्यावस्थेपासून यौवनावस्थेपर्यंत प्रत्येकजण शैक्षणिक टप्पे पार करतो. त्यानंतर प्रगतीचे महाद्वार खुले होऊन त्यात तो रमून जातो. इच्छित ध्येय गाठून पुढे तो स्थिरावतो. सुखासीनता आल्यामुळे थोडा मोकळा होतो. अशा निवांत वेळी मागे वळून बघताना लहानपणीच्या, शाळेतल्या मित्रमैत्रिणी आठवतात. तो त्यांना पुन्हा जोडण्याच्या मागे लागतो. अशाच ध्येयवेड्या आमच्या शाळेतील एका मित्रमैत्रिणीच्या जोडीने सर्वांची रियुनियन अर्थात 'पुनर्भेट' घडवून आणली. २०१५ साली दोघांनी अथक परिश्रम घेऊन माहीत असलेल्या राहण्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन, दूरध्वनी क्रमांक मिळवून, संपर्क साधून जवळजवळ ४० मित्रमैत्रिणींना एकत्र आणण्याची किमया केली. एका सुंदर रविवारी सकाळी प्रशस्त सभागृहात सर्वांनी भेटायचे ठरले. तिथे पोहोचत असताना मनात आलं, वेगवेगळ्या कुटुंबातील आम्हा मुलामुलींची शाळेतील एकाच वर्गात शिशुवर्गापासून ११ वी पर्यंत 'युनियन' झाली. घरातील वडिलधाऱ्यांच्या व शाळेतील शिक्षकांच्या संस्कारांचे 'टॉनिक' मिळून दृढ मैत्रीचे बंध तयार झाले आणि आज तब्बल ४१ वर्षांनंतर रियुनियन होणार होती. अतिशय उत्साहाने व उत्सुकतेने आम्ही सर्वजण ठरलेल्या वेळेच्या आधीच सभागृहात जमलो. सुरुवातीला एकमेकांना बघून आश्चर्याचे धक्केच बसत होते. कुणी जाड, कुणी बारीक, कुणाचे रूपेरी केस तर कुणाचे 'उपनेत्राच्या' महिरपीने सजलेले डोळे. या शारीरिक बदलांमुळे चक्क 'ओळख परेड' झाली. त्यानंतर प्रत्येकाने आपला कौटुंबिक व व्यावसायिक परिचय करून दिला. काहीजण व्यवसाय करून तर काहीजण शिक्षण क्षेत्रात भरारी घेऊन तर काहीजण कलाजगतात मुशाफिरी करून प्रसिद्ध झालेले होते. पण त्यात कुठेही आत्मप्रौढी नव्हती, होता फक्त कर्तृत्वाच्या जोरावर मिळविलेला आत्मविश्वास ! नंतर सर्वांनी गतस्मृतींना उजाळा दिला. एकमेकांची केलेली चेष्टामस्करी, खोड्या, त्यावरून मिळालेली शिक्षा यांचा त्यात समावेश होता. काहीजणांनी शिक्षकांच्या स्वभावावरून बोलण्याच्या लकबींवरून केलेल्या नकलांनी निखळ मनोरंजन झाले. पण त्याचबरोबर त्यावेळच्या शिक्षकांची शिकविण्याची तळमळ, त्यांचे संस्कार, शिक्षेतूनही डोकावणारी आपुलकी याला सर्वांनी एकमुखाने दाद दिली.

त्यानंतरच्या सुग्रास उदरभरणानंतर 'मन'सुद्धा सदैव प्रफुल्लित राहण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने 'व्हॉटसअप'च्या रूपात रियुनियन सुरू आहे. आनंदी राहणे व आनंद देणे या ध्येयाने !

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक १५**

# जिव्हाळ्याचा गोतावळा

**- सौ.वर्षा दिलीप भिडे,** पुणे
९७६३०७९१३१



गणपती म्हणजे आम्हा कोकणातील लोकांचे आवडते दैवत. माझ्या माहेरी माखजनजवळ कासेगावात दरवर्षी माघी गणेश चतुर्थीचा उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो. गावामध्ये जोशी, पाटणकर, भागवत, मराठे, सुर्वे, जाधव इत्यादी घरे आहेत. तसेच पुण्या-मुंबईतसुद्धा आम्हा ग्रामस्थांची घरे आहेत. मी माहेरची पाटणकर. परंतु काहीही झाले तरी माघी उत्सवामध्ये मात्र आम्ही सर्वजण एकत्र जमून उत्सव साजरा करतो. कोकणामध्ये खेळे, जाखडे, सोंग नाचविणे ह्या प्रमाणेच कोकणातील दीड ते दोन तास चालणाऱ्या विविध देवतांच्या आरत्या म्हणजे उत्सवाचे प्रमुख आकर्षण असते. लहानपणी मात्र आम्हाला एवढा वेळ चालणाऱ्या आरत्यांचा कंटाळा येत असे. कारण सर्वसाधारणपणे गणपती, देवी, शंकर, दत्त ह्या ठरावीक ४ ते ५ आरत्या माहीत असायच्या आणि इतर आरत्यांबाबत आम्ही अनभिज्ञ असल्यामुळे त्यात रस वाटत नसे.

आम्हा गावकऱ्यांची पुण्यामुंबईमध्ये १५ ते २० घरे आहेत. तरीसुद्धा वेळेचा अभाव, धकाधकीचे जीवन, कौटुंबिक व्याप ह्यामुळे माघी उत्सव झाला की पुढील माघी उत्सवापर्यंत एकमेकांना भेटणे सुद्धा कठीण होत असे. म्हणून २० वर्षांपूर्वी पुण्यातील ग्रामस्थ पाटणकर, जोशी, भागवत, मराठे, पवार इत्यादी कुटुंबीयांनी एकत्र विचार केला की पुढील पिढीमध्ये आरत्यांच्या चाली, त्याचे शब्द व लय याची गोडी निर्माण होण्यासाठी पुण्यातील ग्रामस्थांनी एकत्र येऊन दर संकष्टी चतुर्थीला संध्याकाळी एक तास, प्रत्येक गाववाल्याच्या घरी आरत्या करायच्या असे ठरले. त्या निमित्ताने उत्सवानंतर कधीतरी भेटणारे गाववाले गणरायाच्या आराधनेच्या निमित्ताने महिन्यातून किमान एकदातरी भेटू लागले आणि गेली २० ते २१ वर्षे हा उपक्रम अखंडपणे आजपावेतो सुरू आहे. ह्या एकत्र जमण्याबरोबरच दरवर्षाला पावसाळ्यात एक दिवसाची सहल काढतो. तसेच दर आरतीला प्रत्येकी १० रुपये वर्गणी घेतो. ह्या पैशांचा विनियोग गावाचा, मंदिराचा विकास करणे, तसेच एकमेकांच्या सुख-दुःखाच्या क्षणी मदतीचा हात देतो.

आजकाल विभक्त कुटुंबे, आयुष्यात ध्येयापर्यंत पोचण्यासाठी होणारी कुतरओढ, अपुरा वेळ, ह्यांमुळे एकमेकांशी प्रत्यक्ष संपर्क व

विचारांची देवाणघेवाण होऊ शकत नाही म्हणून महिन्यातून एक दिवस एक तास काढून जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी व अधिक दृढ करण्यासाठी जीवनात नाती टिकवायला हवीत, त्यातील मायेचा ओलावाही हळुवारपणे जपायला हवा. आम्हा गाववाल्यांना एकत्र येण्याचे बळ मात्र श्रीदेव गजाननाने दिले आहे हे मात्र विसरून चालणार नाही. त्यातूनच आम्हाला अर्थपूर्ण जगण्याची उमेद अन् गोतावळा तसेच जीवलगही मिळाले.

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक १६**

# गोष्ट एका बेबीची

**- सौ. पुष्पा वि. भिडे,** देवगड
९४२०३६८३९२



आम्ही नऊ भावंडं. चार बहिणींनंतर भाऊ, त्यानंतर मी. माझा सहावा नंबर. माझं नांव पुष्पा पण 'बेबी' या नावानेच मला शेजारीपाजारी व नातेवाईक हाक मारतात. सामान्यतः एकुलती एक किंवा पहिलीवहिली किंवा सर्वात लहान (शेंडे नक्षत्र) यांना लाडाने बेबी म्हणतात. पण मी अधलीमधली. माझ्या भावांना पूर्वजांची नावे ठेवलेली, म्हणून त्यांना टोपणनांवं आहेत. माझ्या बहिणींना टोपणनांव नाहीत, मग मला टोपणनांव कसं ? असं एकदा मी आईला विचारलं. आई म्हणाली, तू लहान असताना आमच्याकडे दोन गडी कामाला होते. ते चोवीस तास इथेच असायचे. ते तुला 'फुस्फा' अशी हाक मारायचे. तुझे वडील शिक्षक, त्यांना ते ऐकवेना. तेव्हा त्यांनीच तुला 'बेबी' म्हणायला सुरुवात केली व गड्यांना सांगितले असे आमच्या टोपणनावाचा इतिहास. बेबी या नावाने खूपच गंमतीजमती झाल्या. माझ्या भाचीकडे मी पुण्याला गेले होते. भाची माझ्यापेक्षा तीन वर्षांनी लहान. तिचे इंग्लिश मिडियमला पहिली दुसरीत जाणारे मुलगे. मला सर्वच मावशी म्हणत. आठ दिवसांनी माझी मोठी बहीण तेथे आली. तिने मला 'बेबी' म्हणून हाक मारली. नातवांनी ती ऐकली आणि ते एकमेकांकडे पाहून, खुणा करून हसू लागले. त्यांना बेबी शब्द शाळेत माहिती झाला होता.

एका उत्सवात मी आणि माझ्या भाच्याची मुलगी जवळजवळ जेवायला बसलो होतो. एक वाढपी आला. तो तिला म्हणाला, बेबी, तुला काय हवं ? ती एकदम माझ्याकडे बोट दाखवून म्हणाली, ही माझी बेबी आत्ते ! तिला लहान मुलीला बेबी म्हणतात हे माहीत नव्हतं. बाजूची माणसं हसायला लागली. एक वर्षी माझे मामा आणि कुटुंबीय दिवाळीला मुंबईत राहणार होते. गावाला माझे आजोबा आणि आजी दोघंच होती. मला दिवाळीची सुट्टी होती. त्यामुळे चार-सहा दिवस मी आजोबा आजी सोबत राहावं म्हणून मामानं माझ्या वडिलांना कळवलं. मी आजोबांना येत असल्याबद्दल पत्र लिहिलं व खाली पु. वि. भिडे अशी सही केली. आजोबांनी पत्र वाचलं व पु. म्हणजे पुरुषोत्तम कोण येतो आहे, असा विचार करीत राहिले. येऊ दे कोण तो ! मी गेल्यानंतर तुझं नांव काय ? आजी म्हणाली, मी म्हटलं पुष्पा. आजीला वाचतां येत नसावं. ती म्हणाली, हे सारखे म्हणत आहेत पुरुषोत्तम कोण तो येत आहे. इतकं माझं टोपणनांव बेबी पक्कं झालं होतं. मात्र नंतर आजोबांनी चार दिवसांनंतर मला पुष्पे माझं एक काम कर, असं सांगितलं. औषधी अर्क आणि अत्तरं यांचं पार्सल शिवायचं होतं. ते राजस्थानात पाठवायचं होतं. तो पत्ता मला त्यांनी दिला. तो पार्सलवर लिहून पार्सल रवाना झालं. त्याचे पैसे ते दोन महिन्यांनी देवाघरी गेल्यावर आले.

एकदा मी आमच्या गावातच मेन रोडने चालले होते. मागून कोणीतरी बेबी, बेबी अशा हाका मारत होते. मला इथं कोणी बेबी हाक मारील असं वाटत नव्हतं. म्हणून मी ओ दिली नाही. मान वळवून पाहता येत नव्हतं. मग ती धावत आली आणि खांद्यांवर हात ठेवून म्हणाली, एवढी धाप लागली मला आणि तुला ऐकू आलं नाही ! जवळजवळ पस्तीस चाळीस वर्षांनी आम्ही भेटत होतो. दोघींनाही खूप आनंद झाला.

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक १७**

# एक अविस्मरणीय प्रवास

**- सौ. सुचेता लक्ष्मीकांत भिडे,** सातारा
८३९०८६९७१०



सन १९७८ ते ७९ साल होते. महिना जानेवारी. आम्ही म्हणजे मी, माझे यजमान, मुले आणि सासू-सासरे असे गाडी करून (स्पेशल) गुहागरला जायचे ठरवले. गुहागर चिपळूणच्या पुढे २७ किमी आहे.

संक्रांत झाली आणि दुसऱ्या दिवशी आम्ही जायचे ठरविले. सकाळी सर्व आवरून आम्ही सहा वाजता बाहेर पडलो. संक्रांत झाल्यामुळे गुळाच्या पोळ्या आणि मधल्यावेळचे खाण्याचे पदार्थ, सासूबाईंचा उपवास म्हणून साबुदाण्याची खिचडी असे भरपूर पदार्थ घेऊन आम्ही निघालो. कारण आम्ही प्रथमच कोकणात जात होतो. त्यामुळे तिथे काय मिळते याची काहीच कल्पना नव्हती. ३० वर्षांपूर्वी एवढी सुधारणा नव्हती.

सकाळी सहाला निघालो ते ८॥-९ च्या दरम्यान कोयनानगर येथे गेलो. तिथे माझ्या मावस सासूबाई राहात होत्या. तिथे चहा, खाणे करून पुढे निघालो. तिथूनच आमच्या प्रवासाची खरी सुरुवात झाली. कोयनानगर ते चिपळूण ह्यामध्ये कुंभारली घाट आहे. घाट मोठा, अवघड वळणं आणि अरुंद रस्ता. सुरुवात आमची छान झाली. प्रथमच जात असल्यामुळे कोकणातील सृष्टीसौंदर्य पाहण्यात दंग होतो. निम्म्या घाटात थांबून

वनश्रीने नटलेले डोंगर, दऱ्या, छोटी उतरती छपरांची घरे पाहात त्याचे फोटो काढत होतो आणि पुन्हा प्रवास सुरू झाला. गाडीचे काय बिनसले कुणास ठाऊक, अचानक पेट्रोल गळती सुरू झाली. आता चिपळूण येईपर्यंत काहीच करता येत नव्हते. कसेबसे चिपळूणपर्यंत गेलो. तिथे प्रथम गॅरेज शोधून गाडी दुरुस्तीला दिली. त्याने १५-२० मिनिटात गाडी दुरुस्त केली. आम्ही चिपळूण जवळील परशुराम येथे गेलो. देवाचे दर्शन घेतले, फोटो काढले. तेव्हा सासरे म्हणाले, मी गाडीत जाऊन बसतो तुमचे झाले की या. आम्ही निवांत फोटो काढले. तिथे जवळच आमच्या वन्संचे चुलत दीर राहतात. त्यांच्याकडे चहा घेतला आणि नंतर डोंगर उतरून गाडीपाशी आलो. सगळे एकदम चक्रावून गेलो. कारण सासरे अर्धापाऊणतास आमच्या आधी गाडीत बसतो म्हणून आले होते पण ते गाडीत नव्हते. आजूबाजूला सगळीकडे शोधले. आता काय करायचे ? आम्ही काळजीत पडलो. सासूबाईंनी देवाचा धावा सुरू केला. माझे यजमान आणि ड्रायव्हर दोघे त्यांना शोधत होते. मी मुलांच्या आणि सासूबाईंच्या सोबत गाडीपाशीच थांबले होते. हे पुन्हा परशुरामाच्या देवळात गेले. तिथे चौकशी केली तेव्हा कळले डोंगर दुसऱ्या बाजूने पण उतरता येतो. हे तिकडच्या रस्त्यावर गेले. डोंगर उतरत असताना एक शेतकरी येत होता त्याला विचारल्यावर तो म्हणाला की एक आजोबा काळा कोट व काळी टोपी घातलेले डोंगर उतरत होते. हे खाली उतरून गेले तर बापू (सासरे) समोर कठड्यावर बसले होते. खूप दमले होते. त्यामुळे पुन्हा डोंगर चढून आणणे शक्य नव्हते. मग गाडीच दुसऱ्या रस्त्याने आणली आणि त्यांना गाडीत घेतले. गाडी सुरू होऊन थोडी पुढे गेली आणि बापू एकदम म्हणाले अरे माझी टोपी मी बसलो होतो तिथेच राहिली. पुन्हा गाडी मागे घेतली आणि टोपी घेऊन पुन्हा मार्गस्थ झालो.

चिपळूणच्या दिशेने प्रवास सुरू झाला आणि पुन्हा गाडी बिघडली. चिपळूणपर्यंत पेट्रोलची धार सुरू झाली. काय करावे कळेना. चिपळूणच्या नगरपालिकेजवळ आलो. हे आणि ड्रायव्हर गाडी घेऊन गॅरेजवर गेले. आम्ही सगळे नगरपालिकेच्या पायऱ्यांवर बसलो. तिथेच जवळ जे होते ते खाल्ले. पाणी पण संपत आले होते. एक तास आम्ही तिथे बसलो. गाडी आल्यावर चांगले हॉटेल पाहून जेवणे केली. इतक्या गोंधळात दुपारचे दोन वाजायला आले होते. जेवण झाल्यावर हेदवीच्या गणपतीला जायला निघालो. हेदवी हे गाव गुहागरच्या अलीकडे २ किमीवर. पण ९-१० किमी आत जावे लागते. तिथे पोहोचेपर्यंत संध्याकाळचे ५ वाजले. तिथला निसर्ग पाहून आणि गणपतीचे दर्शन घेऊन मन प्रसन्न झाले. तिथे चहा घेऊन मोठ्या उत्साहाने गुहागरला निघालो.

जानेवारी महिना असल्याने साडेसहालाच अंधार झाला पण चांदणी रात्र असल्याने छान चांदणे पडले होते. प्रवास पण छान चालला होता. मुलांना भूक लागली म्हणून सासूबाईंची राहिलेली खिचडी मुले आणि आम्ही मोठे पण मजेत खात होतो. गुहागर ३-४ किमीवर राहिले होते आणि अचानक खरखर असा आवाज आला. काहीतरी गाडीचे घासते आहे असे वाटले. ड्रायव्हरने गाडी थांबवत आणली तेवढ्यात जोरातच खर्र असा आवाज आला. गाडी थांबल्यावर बघितले तर गाडीच्या चाकाचा पत्रा कापून पूर्ण चाकच निघाले होते. झाले भराभर सामान घेऊन खाली उतरलो. खाली उतरलो खरे पण पोटात धस्स झाले. कारण दोन्ही बाजूला दाट झाडी होती. आणि रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते.

कोकणात अंधार पडला की सामसूम होते. जनावरांच्या भीतीने खेड्यातील माणसं अंधार पडायच्या आतच घरी जातात. गाड्यांची रहदारीपण कमी अशा अवस्थेत आम्ही, मुले, सासू-सासरे रस्त्याच्या कडेला थांबलो. हे दोघे गाडीचे चाक बदलत होते. गाडीला जॅक होता तो लावण्याचा प्रयत्न चालू होता. पण खरेच कोकणात तेव्हातरी माणुसकी दिसून आली. आम्ही थांबलेले पाहून रस्त्याची कामे करणारा एक डंपर थांबला. त्यातील ड्रायव्हरने विचारले, काय झाले ? माझी काही मदत हवी आहे का ? पण जॅक लागेल असं वाटलं म्हणून थँक्स सांगून नको म्हणालो. तो निघून गेला. खूप प्रयत्न केला तरी जॅक लागेना. आता काय करायचे असा मोठा प्रश्न होता. पण आमचे नशीब चांगले म्हणून ४-५ कामगार माणसे कामावरून घरी चालली होती. ती आमच्याजवळ आली. त्यांना एकंदर परिस्थिती लक्षात आली. ते म्हणाले इथे जवळ काहीही सुविधा नाहीत. आम्हालाही उशीर झाला म्हणून आम्ही आता घरी चाललो आहोत. आम्ही गाडी उचलून धरतो तुम्ही जॅक बसवा. झाले, हो-नाही करत त्या ४-५ जणांनी गाडी उचलून धरली व ड्रायव्हरने चाक बसवले. गाडी व्यवस्थित झाली.

खरोखरच ती माणसे आम्हाला देवदूतासारखी वाटली. काम झाले, हे मोबदला द्यायला लागले तर त्यांनी घेतला नाही. इथे पुन्हा माणुसकी दिसून आली. ते म्हणाले, पैसे घेऊन बरोबर का न्यायचे आहेत ? एकमेकांना मदत करणे, गोड बोलणे हे खरे. ते पैसे घेत नाही म्हटल्यावर आम्हाला जरा अवघडल्यासारखे झाले. शेवटी ह्यांनी ह्या पैशातून चहा घ्या, मुलांना खाऊ घ्या असे म्हटल्यावर त्यांनी ते पैसे घेतले.

आमचे नशीब चांगले कारण आमची गाडी पलटी झाली नाही. जर का गाडी उलटीपालटी झाली असती तर ? थोड्या अंतरावर धरणाचा फुगवटा होता. काय झाले असते देवाला ठाऊक. तेव्हा देवावरचा विश्वास दृढ झाला. कारण सासूबाई अखंड नामस्मरण करत होत्या. शेवटी रात्री ९ वाजता गुहागरला पोहोचलो. ज्यांच्या घरी जाणार होतो ते आठवले गृहस्थ सर्व ऐकल्यावर पटकन म्हणाले, श्री व्याडेश्वर तुमच्या पाठीशी आहे म्हणून इतक्या संकटांवर मात करत तुम्ही सुखरूप आलात. आज इतकी वर्षे झाली तरी तो प्रवास जसाच्या तसा आठवतो.

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक १८

# माझी दिल्लीची दिदी

- सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर
८३६९०६०९७९



लहानपणापासून मी राहिले ते आमच्या परशुराम क्षेत्री आणि ते सुद्धा पाच सख्खे आणि पाच चुलत काकांबरोबर. एकत्र कुटुंबात सगळ्यांची मने ओळखून नातीगोती जपण्याचं बाळकडू आम्हा भावंडांना लहानपणापासूनच दिलं गेलं होतं. लग्न झालं आणि मुंबईला छोट्या कुटुंबात राहायला आले. पती सैन्य दलात असल्याने थोड्याच दिवसांत जोधपूरला आम्ही नवीन संसार थाटला. चार वर्षांनी पोस्टींग दिल्लीला झाली आणि मी माझ्या दोन वर्षांच्या बाळाबरोबर दिल्लीला आले. शिस्तबद्ध नवऱ्याने आवश्यक त्या सर्व गोष्टी घरात आणून ठेवल्या होत्या. पहिल्याच दिवशी तळमजल्यावर राहणाऱ्या बाई चहा घेऊन आमच्याकडे आल्या आणि प्रेमाने म्हणाल्या, 'कुछ चाहिए तो बताना, सोचना मत'. मी हो म्हणाले. आता मध्यम वयाच्या गढवाली बाईला काय हाक मारावी अशी विचारात असताना त्याच म्हणाल्या, मी काही म्हातारी नाहीये, तेव्हा मला दिदी अशी हाक मार. मी त्यांना हो दिदी म्हणाले आणि आमच्या नवीन नात्याची सुरुवात झाली. दिदींचे यजमान श्री. रावत सरकारी नोकरीत होते. एक मोठा मुलगा आणि दोन मुली असलेली दिदी प्रेमळ पण कडक शिस्तीची होती. दिवसा आमच्या गप्पा खूप रंगत. आमची कुणाशी फार ओळख नाही हे समजून तिने माझी जवळपास राहणाऱ्या बायकांशी ओळख करून दिली. माझ्या बाळाला स्वतःच उचलून ती जवळच्या छोट्या शाळेत नाव घालायला घेऊन गेली. मग काय, एखादी वस्तू विकत घ्यायची असू दे किंवा डोकं दुखूदे, माझी धाव दिदीकडे. दिदीच्या मुलांचे मी खादाडी संदर्भात खूप लाड करत असे. त्यामुळे तिच्या मुलांची मी संपदा अंटी झाले होते. अभ्यासाचा तिटकारा आलेल्या तिच्या दुसऱ्या मुलीला दहावी पास करायचा विडा मी उचलला आणि त्यात मी पास झाले. माझी सौंदर्य प्रसाधन क्षेत्रातील आवड लक्षात येऊन दिदीने मला एखाद्या नामांकित व्यक्तीकडे जाऊन शिकण्याचा सल्ला दिला आणि स्वतःच ब्युटीपार्लर सुरू करण्याचा सल्ला दिला. मी जावेद हबीबकडे जाऊन एक महिना शिक्षण घेतलं आणि दिदीने माझ्यासोबत माझ्या बाळाचीही काळजी घेतली. माझ्या बाळाचा चौथा वाढदिवस तिने तिच्या घराच्या गच्चीवर असा साजरा केला की जणू तो तिचाच मुलगा आहे. आमच्या आनंदात आनंदी होणाऱ्या दिदीचे पाणावलेले डोळे मी मुंबईला सुट्टीवर जाताना बरेचदा पाहिले होते. आज अनेक अडचणी येऊन सुद्धा मी पंधरा वर्षे मुंबईमध्ये ब्युटीपार्लर चालवत आहे ते तिच्या शुभेच्छांच्या जोरावर. कधीही फोन केला तरी ती नेहमी 'मैं हूँ ना' म्हणत आधार देते. दर वर्षी परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर माझा मुलगा तिला फोन करतो तेव्हा ती म्हणते 'अच्छा, तू इतना बडा हो गया'. मुलीच्या लग्नाला आठ दिवस आधी तिने मला तयारीला बोलावलं आणि बिदाईच्या वेळी मला मिठी मारून खूप रडली. घरापासून दोन हजार किलोमीटरवर तीन वर्षे मी जिच्या बरोबर राहिले, जिने मला माझ्या आईची, बहिणींची, मैत्रिणींची कधीच उणीव भासू दिली नाही ती पूर्वजन्मी माझी कोण होती ते मला माहीत नाही. पण प्रत्येक जन्मी तिने मला माझी दिदी म्हणूनच भेटावं अशीच त्या ईश्वरचरणी प्रार्थना !

---

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक १९

# कल्पवृक्ष कन्येसाठी...

- ॲड. सौ. प्राची भिडे, रोहा.
९७६६४४७९४०



ज्या नात्याविषयी मी लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे ते नाते खरे तर शब्दात मांडण्यासारखे नाही. ज्या नात्याने मला आपले सर्वांचे मूळ कारण असलेल्या परमात्म्याशी असलेले नात्याचे महत्त्व पटवून दिले, जे नाते माझ्या जगण्याचा एक सर्वश्रेष्ठ आधार बनले ते म्हणजे पितृतुल्य वै. विष्णुपंत किंजवडेकर यांच्याशी असलेले वडील मुलीचे नाते.

आपण सर्वच या जगात जन्माला येण्यापूर्वीच आईशी नाळेने जोडून असलेले नाते व जन्मानंतर बहीण, भाऊ, वडील, काका, मामा, आजी, आजोबा अशी अनेक नाती घेऊन येतो. नंतर मग शाळेत, कॉलेजात, कार्यालयात, सोसायटीत, गावात व आजच्या काळात तर इंटरनेटने ही नाती तयार होतात. त्यातील काही नाती विशिष्ट काळापुरती, विशिष्ट कामापुरतीही असतात. तर त्यातीलच काही नाती अगदी शेवटपर्यंत आपल्यासोबत असतात.

काही नात्यांत एकमेकांकडून अपेक्षा ठेवल्या जातात आणि त्या पूर्ण झाल्या नाहीत की उपेक्षा होते. मग ते नाते केवळ कर्तव्य म्हणून निभावले जाते. त्यात प्रेम उरत नाही. कारण फक्त कर्तव्य करणे म्हणजे कोरडेपणा येतो. जिथे प्रेम नसते, ओलावा नसतो त्याला नाते तरी म्हणावे का ? अशी ही मग फक्त व्यवहारापुरती असलेली नाती कधी तरी सुरू होणारी व कधीतरी संपणारी असतात. कधी सुखाचे अनुभव देणारी तर कधी दुःखाचे अनुभव देणारीही ठरतात.

या अशा नात्यांच्या पलीकडे असलेले माझे नाते आहे वै. विष्णुपंत पांडुरंग किंजवडेकर म्हणजेच ती. बाबांशी असलेले. वै. ती. बाबा अतिशय बुद्धिमान उच्चविद्याविभूषित व एका खासगी कंपनीत मोठ्या हुद्द्यावर कार्यरत होते. शास्त्री घराण्यातील असल्याने त्यांच्यावर धार्मिक, आध्यात्मिक संस्कार होतोच. त्यातच त्यांना त्यांच्या पूर्वपुण्याईने आध्यात्मिक गुरू म्हणून ब्रह्मलीन प.पू. स्वामी वरदानंदभारती लाभले होते.

भारतीय संस्कृतीने, वेदाने परमात्म्याची प्राप्ती हेच मनुष्य जन्माचे ध्येय सांगितले आहे. या ध्येयाचे महत्त्व वै. ती. बाबांना तंतोतंत पटले होते. हे प्राप्त करून घेण्यातच कृतकृत्यता आहे असा निश्चय वै. ती. बाबांनी केला. आपली संसारातील मुलांचे शिक्षण, विवाह व इतर जबाबदाऱ्या उत्तम रीतीने पार पाडून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. साधनेसाठी त्यांनी रोह्यात कायमचे निवासासाठी येण्याचे ठरवले. यापूर्वी ते अंबरनाथला राहात होते.

कसे योगायोग असतात पहा. माझ्या जन्मदात्या वडिलाळंची व त्यांची ओळख असल्याने ते आमच्याकडे आले होते. मला माझ्या जन्मदात्या वडिलांची खूपच आठवण झाली. ते त्यापूर्वीच २-३ महिने देवाघरी गेले होते. वै. ती. बाबा किंजवडेकरांशी बोलून तर मला काही तरी मनात अनुबंध जुळून आल्यासारखे वाटले. माझे जन्मदाता वडील वै. श्री. के. वा. भातखंडे यांचा संतसाहित्याचा अभ्यास होता. ते रोज नित्यनेमाने ज्ञानेश्वरी वाचत. त्यामुळे मलाही ज्ञानेश्वरी वाचावी अशी खूप इच्छा झाली. म्हणून मी वाचायला घेतली. पण लक्ष सतत शेजारील पानांवरील ओव्यांच्या अर्थाकडेच जाई व अगदी तीव्रतेने वाटे, कोण आपल्याला अर्थ सांगेल ? आपले वडील असताना न वाचल्याची खंत वाटत होती. पुन्हा योग कसा जुळून आला पहा. वै. ती. बाबा किंजवडेकर घरी आले व मला म्हणाले, मी ज्ञानेश्वरीवरील रोज प्रवचन करणार आहे. बघ तुला आवड असली, शक्य असले तर ये. तुझे वडील रोज वाचत होते. भगवंतानेच माझ्या मनातील इच्छा ओळखून पूर्ण करून घेण्याची संधी दिली होती.

मी दुसऱ्या दिवसापासून ज्ञानेश्वरी ऐकायला जाऊ लागले. वै. ती. बाबा प्रत्येक ओवीचा अन्वय लावून त्यावर विवेचन करत होते. दासबोध, गीता, उपनिषदे, योगवसिष्ठ किती नावे सांगू ? यातील संदर्भ देऊन अगदी तळमळीने दृष्टांत, सिद्धांत पटवून देत. त्यातून त्यांचे चिंतन, साधना, साक्षेप जाणवत असे. मी पहिल्यांदाच ज्ञानेश्वरी ऐकत होते. मला रोज सकाळी उठल्यापासून आज काय ऐकायला मिळेल याचे वेध लागलेले असत. ऐकताना तर इतका आनंद होई की वै. ती. बाबांनी सांगावे व सगळा जीव, प्राण कानात आणून मी ऐकावे यातील नवलाई, आनंद सांगता येणार नाही. याच दरम्यान नक्की आठवत नाही पण ते माझ्यावर मुलीसारखीच माया करू लागले. एखादे दिवशी मी प्रवचनाला गेले नाही तर ते अगदी ऐन उन्हात सुद्धा मी का आले नाही हे विचारण्यासाठी येत. आमच्या रोहे गावात सुमारे २५ वर्षे श्रीविष्णुमंदिरात ज्ञानेश्वरी, दासबोध, गीता, उपनिषदे अशा ग्रंथांवर रोज प्रवचने केली व गावातील लोकांना त्याचा लाभ झाला. गावात कोणतेही उत्सव किंवा धार्मिक कार्यक्रम असले की ती. बाबांचे मोलाचे मार्गदर्शन गावातील लोकांना मिळत असे. गावातील सगळेच त्यांना 'बाबा'च म्हणत व माझे तर ते आता पितृतुल्य बाबाच होते.

ती. बाबांनी मला गीता, विष्णुसहस्रनाम, महिम्न यांसारखी स्तोत्रे संथा देऊन शिकवली. ते नेहमी मला विचारीत, 'काय वाचतेस ? कसला अभ्यास करतेस की नाही ? नुसतेच श्रवण नको. त्यावर मनन हवे. आपले स्वतःचे वाचन हवे.' शाळा कॉलेजमधील शिक्षण संपल्यावर असा प्रश्न कधी ऐकावा लागेल असे वाटलेच नव्हते. पण ती. बाबा म्हणायचे, घर, संसार, व्यवसाय हे सगळे असणारच. त्यातून रिकामा वेळ मिळाला की फक्त टी.व्ही. मालिका, मासिके, कादंबरीवाचन, गप्पाटप्पाच करायच्या का ? आपल्या मन, बुद्धीची उन्नती होईल, व्यापकता येईल असे वाचन करायला हवे. त्यासाठी मुद्दाम वेळ काढायला हवा असे नुसते बोलून ते थांबले नाहीत तर जे ग्रंथ मी एकटीने कधीही वाचले नसते असे गीतारहस्य, भागवत इत्यादी ग्रंथ माझ्याकडून समोर बसून वाचून घेतले. संतसाहित्याच्या वाचनाने, अभ्यासासने मनाला खरे समाधान मिळते बाकी सगळ्या प्रापंचिक गोष्टीतून मनाचे असामाधानच वाटत असते असे ते नेहमी म्हणत.


वै. ती. बाबांच्या आचरणात एक अनुशासन, मर्यादा होती. आपला वेळ, शक्ती ते नेहमी ज्या गोष्टी कल्याणाकडे नेतात त्यासाठीच वापरत. दिवसाचा क्षण न् क्षण त्यांची साधनाच चालू असे सतत वाचन, लेखन, नामस्मरण, प्रार्थना, प्रवचन, चिंतन चालू असे. म्हणजेच त्यांच्या जगण्याला आध्यात्मिक विचारांचा भक्कम पाया होता अशा आध्यात्मिक विचार असलेल्या, परमार्थाच्या मार्गावर असलेल्या वै. ती. बाबांशी नाते जुळल्याने आपोआपच माझेही ज्ञानेश्वरीशी, गीतेशी गोड नाते जुळले. आमच्या नात्यात कोणतीही व्यावहारिक अपेक्षा-देवघेव नव्हती. त्यामुळे या नात्यातून मला नेहमीच अखंड आनंद आणि आनंदच मिळत गेला. त्यांच्याकडून या ग्रंथाचे श्रवण केल्याचा परिणाम असा झाला की, आज निवृत्तीच्या काळात रिकाम्या वेळात काय करावे ? असा प्रश्न पडत नाही. बदलणाऱ्या अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीतही चित्ताची स्थिरता टिकवण्यासाठी वै. ती. बाबांच्या विचारांचा मला खूप लाभ होतो. परिस्थितीकडे बघण्याची दृष्टी वै. बाबांकडून कळली. त्यामुळे संसाराच्या चढ-उतारात बऱ्यापैकी स्थिरता येते. समोरच्या परिस्थितीशी संघर्ष करण्यापेक्षा आपल्या ठिकाणी चित्त स्थिर राहण्यासाठी स्वतःशीच संघर्ष केला की मनाचे समाधान ठेवता येते. अशा सगळ्याच प्रसंगांत सर्वच वेळी वै. ती. बाबा विचाराने माझ्याबरोबर असतात. त्यामुळे ते वैकुंठवासी होऊन आज दहा वर्षे झाली तरीही ते मला आमच्यात नाहीत असे वाटत नाही. ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक ओवीत नव्हे तर प्रत्येक शब्दात मला ते जाणवतात.

म्हणूनच या नात्याला मी अभंग आनंदाचे नाते म्हणते. ज्ञानेश्वरीशी त्यांनी माझे नाते जोडून दिले. अधिक काय हवे ? वै. ती. बाबांनी गीतेशी, ज्ञानेश्वरीशी जोडून दिलेले नाते वृद्धिंगत कसे होईल, आनंदाचे कसे होईल यासाठी मी प्रयत्न करणे हेच त्यांना माझ्याकडून अपेक्षित आहे असे मला वाटते. हा मोठा ठेवा जणु वारसा त्यांनी मला दिला आहे. असे हे माझे पितृतुल्य वै. बाबांशी असलेले व्यवहारापलीकडचे निरपेक्ष नाते. वै. ती. बाबांविषयीच्या आदरातून, प्रेमातून हे नाते व्यक्त करावेसे वाटले. या अनुबंधाच्या ऋणातच मला जन्मोजन्मी राहायचे आहे. जन्मोजन्मी अशा कल्पवृक्षाच्या सावलीत मला शांतता, निवांतता, समाधान मिळावे हीच परमेश्वराच्या चरणी प्रार्थना आहे.

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक २०**

# रक्तापलीकडचे नाते

**- श्रीमती उज्ज्वला साठे**, पुणे
९८५०८४५६७०



आम्ही मुंबईला मुलुंड येथे राहात होतो. नवीन तीन मजली बिल्डिंगमधे सगळेचजण नवीन राहायला आले. प्रत्येकाला एकमेकांची गरज होतीच. त्यामुळे सर्वजण एकोप्याने राहात होतो. तरी सुद्धा आम्हा तीन बिऱ्हाडांचे संबंध खूप जवळचे झाले. एखाद्याकडे कोणी नातेवाईक आले आणि घराला कुलुप असले तरी त्याचे आदरातिथ्य उत्तम होत असे. त्यामुळे तिघांचेही नातेवाईक एकमेकांना ओळखत असत. कोणत्याही अवघड प्रसंगी त्यांचे नातेवाईक येईपर्यंत वेळ निभावून जाई. पुढे त्याचा कधीही उच्चारही केला जात नसे. दोन मुलगे, आई-वडील व छोटी मुलगी, तिचे आई-वडील व आम्ही असे तिघांचे घनिष्ठ संबंध झाले. छोटी मुलगी (लीना) तिचे वडील फिरतीवर असत. लीनाची आई नोकरी करत असे. लीनाला सांभाळायला बाई होती. पण खूप वेळ ती माझ्याकडेच असे. त्यामुळे तिला माझा लळा लागला. आम्ही दोघी तिला घेऊन बाहेर गेलो तर लोक विचारायचे, तुम्ही नणदा भावजया आहात का ? मुलांचे वडील मुलं शाळेत गेली की ऑफिसला जात असत. ते आम्हाला लक्ष ठेवायला सांगून जात. १ वाजता मुलं शाळेतून आली की ती जेवून खेळायला जात. पण त्यांची आई मूडमध्ये नसेल तर मुलं उपाशी राहात. मग अशा वेळी आम्ही दोघीजणी त्यांना जेवायला घालून खेळायला पाठवत असू. काही वर्षांनी आम्ही तिघेहीजण वेगवेगळ्या ठिकाणी राहायला गेलो. पण संबंध तसेच होते. लीना खूप नर्व्हस झाली. पुढे लीनाचे लग्न झाले. नंतर तिची आई खूपच आजारी झाली. त्यांना बघायला मी गेले पण त्यांनी आवाजावरून मला ओळखले. जणूकाही भेट होण्यासाठीच त्या राहिल्या होत्या. पुढे लीनाच्या मुलीचे लग्न ठरले. लग्न ठरल्याबरोबर फोन लगेच आला. तिच्या भावाला मुलगी बघण्यासाठी तिचे वडील म्हणायचे मामी तुम्ही मुलगी, घर, माणसं बघा, मग आपण बोलणी करू. पुढे आम्ही लग्नाला गेलो. आम्हाला पाहून तिच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता. ती म्हणाली, आज माझी माहेरची माणसं आली. आज अखेरही संबंध तसेच आहेत. रक्ताच्या नात्याच्या पलीकडचेच संबंध आमच्यामध्ये निर्माण झाले.

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक २१**

# टोपण नावाची गोष्ट

**- सौ. गार्गी भिडे** पनवेल
८४५२०४०९३२



माणसाला बारशात एक नाव मिळतं, पण आजूबाजूच्या लोकांमुळे किंवा घरच्यांच्या लाडामुळं एक नवीन नाव मिळून जातं. तेच ते टोपण नाव बरेचदा, माणसाची खरी ओळख बनून जाते हो. बघा तुमचे कोणी मित्रमैत्रिणी असतील, तर आठवून पहा, टोपणनावाने माणूस सहज आठवतो. त्याचं असं झालं की, मी अगदी बाळ असताना, माझे एक काका आले होते आणि मला खेळवताना ते चिंगी, चिंगी असं म्हणाले आणि त्या क्षणी माझं परत बारसं झालं म्हणाना ! हे असं या वयात टोपण नाव सांगणं म्हणजे जरा कससंसं होतंय हो, पण मग त्यातल्या गमती कशा सांगणार बरं ? आणि तसंही तुम्ही सगळे माझेच आहात, म्हणून सांगते बापडी की वयानी एवढी मोठ्ठी होऊनही अजूनही मी आपली चिंगी म्हणूनच ओळखली जाते.

त्याचं काय झालं, घरात मला चिंगी म्हटलं जाऊ लागलं आणि वाड्यातली, शेजारची मुलंमुलीच शाळेत असल्यानं साहजिकच मला शाळेत पण चिंगी म्हणून ओळखलं जाऊ लागलं आणि हीच सगली जत्रा दहावीपर्यंत बरोबर होती, त्यामुळं तोपर्यंत मी चिंगीच बरं ! तरी नशीब महाविद्यालयात कोणी मला त्या नावानं बोलवत नव्हतं. अर्थात, त्यावेळच्या प्रथेनुसार आम्ही मुलांशी बोलत नव्हतो, पण जेव्हा दहावी नंतर पंचवीस वर्षांनी भेटलो, तेव्हा वर्गातील मुलांशी बोललो. तेव्हा एकाने विचारलंच, अजून तुला कुणी चिंगी म्हणतं की नाही ? दादाला टेप्या म्हणायचे म्हणून मला त्याची बहीण टेपी, असं काहीजण म्हणायचे. पटवर्धन आडनाव म्हणून एक सर दादाला पट्या म्हणायचे आणि पटी म्हणायचे. कधी राग यायचा, कधी गंमत वाटायची. पण या वयात सुद्धा मी चिंगी आहे म्हणून मज्जा वाटते. त्यातही वाड्यात अजून एक चिंगी आली, नंतर ती वयाने मोठी, म्हणून ती मोठी चिंगी आणि मी बिटकी चिंगी, आहे ना गंमत ? टोपण नावांच्या खूप गमतीजमती असतात ना ? बाबांच्या ऑफिसात बरेच कुलकर्णी होते म्हणून त्यांच्या अद्याक्षरांवरून त्यांना बोलवायचे. त्यातलेच एक जे. वाय. कुलकर्णी. त्यांना सगळे जे.वाय. म्हणून बोलवायचे. एकदा एक नवीन शिपाई आला आणि साहेबांनी सांगितलं, 'जे.वाय.ला बोलवा' हा म्हणाला, 'बोलवतो, पण कुणाला ?' साहेब परत म्हणाले, 'अरे जे.वायला बोलाव म्हटलं ना ?' हा परत, 'हो साहेब, पण कुणाला ?' असं दोन-तीनदा झालं आणि मग साहेबांच्या लक्षात आलं, काय झालं ते. मग त्यांनी सांगितलं, 'अरे, जे.वाय. कुलकर्णीला बोलव रे'. मग त्याच्या लक्षात सगळा प्रकार आला आणि दोघे खूप हसले. कित्येकांना त्यांच्या अंगकाठीवरून पण टोपणनावं मिळतात. जसं की, अगदी बारीक असेल तर सुकट किंवा एकीला तर बडीशेप असं नाव पण मी ऐकलंय मी. तर, टोपण नावाशी निगडित, अशा बऱ्याच गोष्टी आहेत. सुरस कथा पण आहेत. माझं नांव मी आता सांगितलं असलं तरी त्या नावाने फक्त माझे बालपणीचे मित्रमैत्रिणी आणि माझं कुटुंबच हाक मारू शकतं हां ! सांगून ठेवते !

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक २५

# स्टार्टअप

सौ. शैलजी शरद गोगटे, चेंबूर
८४२४८६५५७१



हल्ली सगळ्या मुली केवळ पदवीधर असल्या तरी छोटी-मोठी नोकरी करतात. कारण हल्लीच्या मुलांना नोकरी करणारी बायको हवी असते. परंतु माझे मत असे आहे की, नुसत्या पदवीधर (बी.ए., बी.एस्सी., बी. कॉम.) असलेल्या मुलींनी लग्न झाल्यानंतर नोकरी न करता सोयीनुसार घरात राहून करता येईल असा कोणताही छोटा व्यवसाय सुरू करावा. हळूहळू तो वाढत जातो. एकदा व्यवसाय सुरू केला की नवीन नवीन कल्पना सुचतात व व्यवसायात प्रगती होत राहते. प्रोफेशनल क्वालीफाईड मुलींनी, उदा. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, सी.ए. मुलींनी जरूर नोकरी करावी किंवा प्रॅक्टीस करावी कारण त्यांच्या शिक्षणाचा त्यांच्या नोकरीत/प्रॅक्टीसमध्ये थेट उपयोग होतो व त्यांना मिळणारा पगारही चांगला असतो. मी स्वतः बी. एस्सी. आहे. पण मला नोकरी करण्याची आवड नव्हती व सासरी पण ते शक्य नव्हते. पण मण माझ्या वडीलांचे उद्योजकाचे गुण माझ्यात आले. त्यामुळे मला स्वतःचा व्यवसाय करण्याची आवड होती. अगदीत व्यवसायच नाही तरी, घरकामापलीकडे कशात तरी मन रमविण्याची इच्छा होती. मला शिकविण्याची अतिशय हौस ! त्यामुळे सुरूवातीला हौस व समाजसेवा अशा दोन्ही अंगाने मी जवळपासच्या मुलांना शिकवायचे. नंतर माझ्या कलकत्त्याला राहणाऱ्या मोठ्या बहिणीने तिकडचे भरलेले परकर, पेटीकोट तसेच बंगाली साड्या पाठवायला सुरू केले. ते सर्व कपडे मी इथे मुंबईत ओळखीच्या, नात्यातल्या बायकांना विकत असे. त्याचबरोबर फॉल बिडींग करुन देणे, रुमाल भरुन देणे अशी छोटी कामेही करायचे.

आम्ही एकदा हॉटेलमध्ये गेलो होतो. तिथे इडली-डोश्याचे पीठ दळण्याचा विजेवर चालणारा रगडा पाहिला. आमच्या चेंबूरच्या घराच्या आसपास दाक्षिणात्य लोकांची भरपूर वस्ती होती व त्यांच्या घरी हाताने दळण्याचा दगडी रगडा असे. यामध्ये पीठ दळण्यासाठी वेळ व श्रम दोन्हीही खूप लागत. माझ्या मनात आले की आपण हा विजेवर चालणारा रगडा घेऊन इडली-डोश्याचे पीठ दळूण देण्याचा व्यवसाय सुरू करावा काय? हा विचार येताच हॉटेल मालकाकडे हा रगडा कोठे मिळतो याची चौकशी केली. घरी सर्वांनाच ही व्यवसायाची कल्पना पसंत पडली. त्यामुळे रगडा विकत घेतला. आजूबाजूच्या बऱ्याच दाक्षिणात्य बायका माझ्याकडे पीठ दळून घेण्यासाठी येऊ लागल्या. मी चेंबूरच्या स्थानिक पेपरमध्ये जाहिरातही दिली. त्यामुळे आणखी बऱ्याच बायका येऊ लागल्या. माझी मुलेही मोठी झाली होती. त्यामुळे ती दोघेही शाळेला गेली की मी दळपाचे काम सुरू करायचे. पहिले वर्षभर बायका त्यांचे दळण पूर्ण होईपर्यंत तिथेच बसून राहायच्या. पण गर्दी वाढू लागली तसा त्यांचा खूप वेळ थांबण्यात जावू लागला. नंतर तोपर्यंत त्यांना माझ्याबद्दल विश्वासही वाटू लागला की त्यांना हवे तसे पीठ माझ्याकडून दळून मिळणार. नंतर त्या सकाळी येऊन दळण ठेवून जायच्या व सायंकळी न्यायला यायच्या. ६-७ वर्षे हे काम मी मोठ्या जोमाने केले. विजेवर चालणारा टेबलावर ठेवता येईल एवढा लहान रगडा बाजारात मिळू लागला. त्यामळे माझ्याकडचे काम हळूहळू कमी होऊ लागले व मग मी रगडा विकून टाकला.

नंतर घरघंटी विकत घेतली. त्यावर सगळी कोरडी पीठे दळता यायची. मग मी त्यावर चकली, थालीपीठ, उपवासाची भाजणी, ढोकळा, इडलीचे रेडीमिक्स, मेतकूट अशी कोरडी पीठे दळून विकायचा व्यसवाय सुरू केला. मुंबई ग्राहक पंचायतीच्या चेंबूर येथील एका पंचायतीची मी सभासद होते. त्यावेळी म्हणजे १९८५-८६ च्या असपास चेंबूरमध्ये सुमारे १६-१७ असे संघ होते. तेंव्हा आमच्या चेंबूरच्या स्थानिक संघात माझे पदार्थ विकले जायचे, मागणीही चांगली असायची. सन २००१ मध्ये दापोलीला बंगला बांधल्यावर आम्ही दोघे तेथे राहयला आलो. तेथे घरगंटी घेऊन गेलो.

तेथे ‘दापोली बझार’ नावाचे एक सुपर मार्केट नवीनच सुरू झाले होते. तिथे स्थानिक लोकांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळायचे. त्यामुळे मी माझा व्यवसाय दोपोलीत पुन्हा सुरू केला. दापोलीत त्यावेळी ५-६ तास लोडशेडींगमुळे वीज नसायची. मी मुंबई श्रमिक विद्यापीठाचा मेणबत्त्या तयार करण्याचा कोर्स केला व मेणबत्त्या बनविण्याचा व्यवसाय सुरू केला. दापोलीतील अन्य दुकानातूनही मी माझी उत्पादने विक्रीसाठी ठेवू लागले. तेथे भरणाऱ्या विविध प्रदर्शनातून स्टॉल घेऊन माझी उत्पादने विकू लागले. माझी आई म्हणायची की, खायच्या पदार्थाला कधीही मरण नाही, ते अगदी खरे ठरले. हा व्यवसाय मी १०-१२ वर्षे केला. वयोमानामुळे आम्ही सन २०१२ मध्ये चेंबूरला आमच्या मुलांबरोबर राहयला परत आलो. आज मी ८३ वर्षाची आहे. वयोमानामुळे झेपत नसल्यामुळे मुंबईला आल्यावर मी माझी घरघंटी विकून टाकली. आता माझा वेळ मी वाचनात घालवते. मोबाईल, टॅबलेटवर व्हॉटसूॲप, फेसबुक वापरायला शिकले. त्यामुळे सोशल मिडीयावर माझा वेळ छान जातो. त्याचबरोबर पत्ते, कॅन्डी क्रॅश, शब्दकोडे यासारखे खेळ मोबाईलवर खेळत असते. मागे वळून पाहताना असे वाटते की, काळानुरुप घरी बसूनच व्यवसाय केले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्रही झालोच, पण त्याचबरोबर घराकडे, मुलांकडे नीट लक्षही देता आले. त्यांच्याशी संवाद टिकून राहिला. नोकरी करताना होणारी तारेवरची कसरत टाळता आली आणि एकूणचा सगळ्याचा समतोल राखून आयुष्य आनंदात व्यतीत झाले.

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

## देवपण

एकदा एक दगड काळा, गेला विठ्ठलाच्या देवळात।
जाऊन उभा ठाकला, विठ्ठलाच्या पुढ्यात ॥१॥
म्हणे अरे विठ्ठला दोघे आपण काळे, कुठे आहे फरक।
मला बी उभं राहायचं इथे, जरा तू सरक॥२॥
विठ्ठल म्हणे त्याला दमानं घे जरा, बोलू आपण बसून।
रखमाईला विचारलं पाहिजे, नाहीतर बसेल रुसून ॥३॥
दगड म्हणे नको करू आडी, नाही तुझा सवता-सुभा।
तुम्हा दोघांसंग आता मी बी राहीन उभा ॥४॥
मला बी होईल अभिषेक, होईल शासकीय पूजा।
मुख्यमंत्री कुणी बी असो, बामन असो वा दुजा ॥५॥
हसून म्हणे विठ्ठल, माझी काहीच नाही हरकत।
पण पुजारी येतील सकाळी, तोवर मी नाही सरकत ॥६॥
दगड पाहून सकाळी आली, पुजाऱ्यांच्या कपाळी आठी।
उचलून भिरकावला दगड, चंद्रभागेकाठी ॥७॥
चंद्रभागेच्या वाळूत, बसला होता मूर्तिकार।
वेगवेगळ्या दगडातून करी सुंदर मूर्ती साकार ॥८॥
काळा दगड त्याच्या पुढ्यात येऊन पडला।
कहाणी त्याची ऐकून, मूर्तिकार चिडला ॥९॥
मन त्याचे द्रवले, आली त्याला स्फूर्ती।
घडवली त्या दगडातून काळ्या रामाची मूर्ती ॥१०॥
मग नदीत मूर्ती सापडल्याची वार्ता त्याने प्रसवली।
गावकऱ्यांनी मूर्ती घेऊन देवळात नेऊन बसवली ॥११॥
विठ्ठल हसला गालात, चंद्रभागेकडे पाहून।
रखमाई चिडून म्हणे, हसून राहिला काहून ॥१२॥
मूर्ती म्हणे विठ्ठला, ठाव आहे मला का हसता आपण।
सोसल्याविना टाकीचे घाव कधी मिळतंय का देवपण ॥१३॥

- चिंतामणी भिडे, ठाणे

पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

साप्ताहिक प्राजक्त

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS